# समरसतेशिवाय सामाजिक समता अशक्य !

द. बा. ठेंगडी

भारतीय विचार साधना प्रकाशन
पुणे

# समरसतेशिवाय सामाजिक समता अशक्य

द. बा. ठेंगडी

■ **प्रकाशक**

ब. शं. दाते
भारतीय विचार साधना पुणे
१८४७ सदाशिव पेठ, दातेवाडी
पुणे - ४११ ०३०.

© **सर्व हक्क प्रकाशकाधीन**

■ **मुद्रक**

श. हे. गुर्जर
आयुर्विद्या मुद्रणालय
९९२ सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०.

■ **पुनर्मुद्रण : जुलै १९९९**

■ **विक्री केंद्र**

भारतीय विचार साधना पुणे
'मोतीबाग', ३०९ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.
दूरभाष : (०२०) ४४९०४५४

■ **मूल्य रु. १५/-**

## मनोगत

दिनांक १४ एप्रिल १९८३ हा दिवस संस्मरणीय आहे. कारण हिंदू कालगणनेप्रमाणे पू.डॉ. हेडगेवार ह्यांची आणि इंग्रजी कालगणनेप्रमाणे पू.डॉ. बाबासोहब आंबेडकर ह्यांची जन्मतिथी याच दिवशी आली. हा एक अपूर्वच योग होता. या सुमुहूर्तावर पुणे येथे **'सामाजिक समरसता मंच'ची** ची स्थापना करण्यात आली. पुढील वर्षी पू. बाबासाहेबांचे जन्मदिवशी मंचाचा पहिला वर्धापन-दिन साजरा करण्यात आला. या दोनही प्रसंगी श्री. दत्तोपंत ठेंगडी ह्यांनी दिलेल्या भाषणांवर आधारलेली ही पुस्तिका वाचकांचे हाती देताना आम्हाला सात्त्विक आनंद होत आहे. सामाजिक समता व सामाजिक समरसता यांच्या अन्योन्य संबंधाविषयी पुनर्विचार करण्याची इच्छा नवरूढीवादी पुरोगामी विचारवंतांच्या मनात या पुस्तिकेच्या वाचनाने झाली तर आमचे श्रमसाफल्य झाले असे आम्हाला वाटेल.

प्रकाशक

## समरसतेशिवाय
## सामाजिक समता अशक्य !

दिनांक १४ एप्रिल १९८३ रोजी 'सामाजिक समरसता मंचा'ची स्थापना झाली. याला काही कारणेही होती.

गेल्या काही वर्षांमध्ये देशाची परिस्थिती बिघडत चालली आहे हे आपण पाहतो आहोत. निरनिराळे नवीन प्रश्न उत्पन्न होत आहेत हे आपण पाहतो आहोत. राजकीय माणसे, कुठेही फोड वगैरे उत्पन्न झाल्यास मलमपट्टी करण्याकरता धावतात तशी धावतात. परंतु साधारणतः मूळ बिमारी काय आहे याचा विचार न केल्यामुळे किंवा रक्त खराब झालेले आहे, रक्त जर शुद्ध झाले नाही तर या मलमपट्टीमुळे एक फोड बरा होईल, पण एक फोड बरा झाला तरी दुसऱ्या ठिकाणी पुन्हा फोड येऊ शकेल, पुन्हा मलमपट्टी करावी लागेल, तेव्हा फोड आल्यानंतर त्याची मलमपट्टी करणे, त्याला दुरुस्त करणे ही तात्कालिक आवश्यकता आहे ही गोष्ट खरीच आहे. त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. परंतु त्याचबरोबर मूळ बिमारी काय आहे, मूळ रोग काय आहे, हे निदान करून रक्तशुद्धीचे औषध घेणे हेही आवश्यक आहे. स्थायी इलाज तोच आहे. पण राजकारणामध्ये सगळ्यांनाच घाई असते. त्यामुळे निदान करण्याइतकासुद्धा मनाचा शांतपणा राहात नाही. मलमपट्ट्या करण्यामध्येच सगळा वेळ निघून जातो आणि त्यामुळे मग असे होते. आज पंजाब भडकलाय, उद्या आसाम खाली चाललाय, परवा तामिळनाडू उडून गेलेला आहे, अशा प्रकारचे विचार आपल्या मनामध्ये येतात. तेव्हा खोलपणाने, गंभीरपणाने या सर्व प्रश्नांचा कुणी विचार केला आहे का? असा जर केला असेल तर बिमारीचे काही निदान केले आहे का? याविषयी काही उपाययोजना कुणी सुचविली आहे का? हे जेव्हा आम्ही पहायला लागलो तेव्हा असे लक्षात आले की, काही श्रेष्ठ पुरुषांना त्या काळात असावे तितके रेकग्निशन (मान्यता) समाजाने दिलेले नाही. पण येणारा भविष्यकाळ ज्यांना मान्यता दिल्याशिवाय राहणार नाही अशा प्रकारचे काही श्रेष्ठ पुरुष आपल्या डोळ्यादेखत आपल्या देशामध्ये झालेले आहेत. त्यांनी अशा प्रकारची काही निदाने केलेली आहेत. त्यावर काही उपाययोजना सुचवल्या आहेत आणि त्या अमलात आणलेल्याआहेत. अशा दोन श्रेष्ठ पुरुषांचा जन्मदिवस योगायोगाने गेल्या वर्षी एकाच दिवशी १४ एप्रिलला आला. इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे पूजनीय बाबासाहेबांचा व हिंदू कॅलेंडरप्रमाणे पूजनीय डॉ. हेडगेवार यांचा.

दोघांनीही गहन चिंतन करून रोगाचे निदान व त्यावर उपाययोजना सुचवली. तेव्हा असा हा जो योगायोग आहे हा एक उत्कृष्ट मुहूर्त, अशा प्रकारचा मंच तयार करण्याकरता आहे असे समजून या शुभ मुहूर्तावर सामाजिक समरसता मंचाची स्थापना करण्यात आली. या सामाजिक समरसता मंचाने फार काही मोठी कामगिरी करावी अशी अपेक्षा नसली तरी या दृष्टीने सामाजिक चिंतन करणाऱ्या लोकांना वारंवार एकत्र आणून आणि त्यांच्या चिंतनाला गती देऊन त्यांत समन्वय निर्माण करावा इतकेच लहानसे काम या संचाने करावे अशा कल्पनेने हा मंच गेल्या वर्षी निर्माण झाला.

तेव्हा यामध्ये प्रेरणास्थान म्हणून या दोन डॉक्टरांचा आपल्यासमोर उल्लेख झालेला होता. त्यांपैकी पू.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिवसानिमित्त आज आपण एकत्र आलो आहोत आणि त्यांच्या आयुष्याच्या जीवनपटाविषयी जरी आपण विचार करणार नसलो तरी त्यांच्या कार्याचे मूल्यांकन, जे भविष्यकाळ करणारच आहे ते ध्यानात घेऊन आजच्या या दिवशी त्यांना श्रद्धांजली वाहताना त्यांना काय अभिप्रेत होते, काय पाहिजे होते आणि त्यांना जे पाहिजे होते ते घडवून आणण्याचे काय मार्ग आहेत त्याविषयी संक्षेपाने विचार करणे हे अप्रासंगिक होणार नाही असे मला वाटते.

## पू. बाबासाहेबांचे आकर्षण

विषयाला प्रारंभ करण्यापूर्वी एक स्पष्टीकरण देणे उचित होईल असे वाटते. मी स्वतः व्यक्तिशः पू. बाबासाहेबांकडे का आकृष्ट झालो याविषयी. त्यांचा व माझा बराच संबंध आला, अर्थात् हे सांगणे आवश्यक आहे की, हा जो संबंध होता तो काही बरोबरीचा नव्हता. तर मी एक लहान, तरुण कार्यकर्ता, आणि ते एक ज्येष्ठ, श्रेष्ठ भारतीय स्तरावरचे पुढारी यांच्या मधला असावा असा तो संबंध होता. हा सुद्धा खुलासा करणे या ठिकाणी आवश्यक वाटते.

१९५० पर्यंत पू. बाबासाहेबांचे नाव वगैरे ऐकले होते. परंतु त्यांच्याविषयी ते एक सेक्शनल, सेक्टेरियन लीडर अशा प्रकारची माझी धारणा होती. व्यक्तिगत संबंध नव्हता. जीवन-चरित्राची माहिती नव्हती. कार्याचीही नव्हती. प्रथम १९५० च्या सुमाराला या व्यक्तिमत्वाकडे आम्ही काही तरुण आकर्षित झालो. याचे एक कारण असे होते की, आयुष्यातली माझी तीन वर्षे राजकीय कार्यात गेली आहेत. त्या सुमारास दोन मोठे पुढारी, दोन्हीही डॉक्टर्स—त्यांच्या एका कृत्यामुळे आम्ही तरुण लोक त्यांच्याकडे आकर्षित झालो होतो. एक पू.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दुसरे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी! दोघांनाही पं. जवाहरलालजींनी पहिल्या मंत्रिमंडळात स्थान दिले होते. परंतु दोघांनीही मंत्रिमंडळातून त्यागपत्र दिले. ही घटना आम्हा लोकांना लोकविलक्षण वाटली. या दोन्ही डॉक्टरांमध्ये

व्यावहारिक शहाणपणाचा पूर्णपणे अभाव आहे हे पाहिल्यावर फार श्रद्धा उत्पन्न झाली; कारण खरे म्हटले तर व्यावहारिक शहाणपणा हाच आहे की आपण आहोत मंत्री, मंत्रिमंडळात राहावे, फार गडबड करू नये. ठीक आहे. डॉ. बाबासाहेबांना जवाहरलालजींनी असे म्हटले होते की, आम्ही तुम्हाला फायनान्स डिपार्टमेंट देऊ; पण पुढे ते दिले नाही. हे असे काही जरी असले तरी गाडीत बसून राहावे, गाडी पुढे जाते, केव्हा तरी टर्मिनस स्टेशन येते. "को कालः फलदायकः" केव्हातरी आपले भविष्य उज्ज्वल होऊ शकते. आज नाही उद्या. हा साधा विचार सोडून किंवा जो प्रोग्रेसिव्ह विचार आज सर्व लोकांमध्ये आहे, की सत्ताप्राप्तीकरिता सिद्धांताचा वापर करायचा. सत्ता प्राप्त व्हावी, सत्तेमध्ये आपण सहभागी राहावे याकरता सिद्धांताची घोषणा करायची, हा जो एक प्रोग्रेसिव्ह व्यावहारिक विचार आहे हा न घेता, सिद्धांताकरता सत्तेचा वापर. सत्तेवर राहूनही सिद्धांताची सेवा होत नसेल तर सत्तेला लाथ मारून बाहेर येणे, हा जो एक वेडेपणा या दोन्ही डॉक्टरांनी दाखवला, त्यामुळे त्यांच्याविषयी एक श्रद्धा तरुण लोकांच्या मनामध्ये उत्पन्न झाली आणि त्यानंतर क्रमाक्रमाने त्यांच्या सहवासात येण्याचे योग आले. आमच्या पहिल्याच भेटीमध्ये मला असे वाटले की, काहीतरी लोकविलक्षण प्रकरण आहे. अर्थात् हे स्पष्ट आहे की, मीही त्या वेळी ३१ वर्षांचा म्हणजे तरुणच होतो. फ्रेश फ्रॉम युनिव्हर्सिटी. त्यामुळे माणसाचे मूल्यांकन वगैरे करण्याइतके परिपक्व असे मन नव्हते. पण त्याही स्थितीमध्ये, काही घटनांमुळे हे काहीतरी अपूर्व अशा प्रकारचे व्यक्तिमत्व आहे हे वाटायला लागले. पहिल्या निवडणुकीच्या पूर्वी पू. बाबासाहेब नागपूरला आले होते. सभेनंतर प्रेस कॉन्फरन्स झाली. प्रेस कॉन्फरन्समध्ये त्यांनी काही प्रश्नांची उत्तरे दिली. पण एक प्रेस कॉरस्पॉन्डंट, श्री. शरद शेवडे, नागपूर टाइम्सचे, जे माझे मित्रही होते, ते नंतर थांबले व बाबांना म्हणाले, "बाबासाहेब, मला एक प्रश्न विचारायचा आहे. मी तो जाहीरपणे विचारू शकत नव्हतो." पू. बाबासाहेब म्हणाले, "काय आहे?" "तुम्ही असे म्हटले की, आम्ही जे शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशन निवडणुकीच्या आखाड्यात उतरविलेले आहे, ते केवळ सरकारला विरोध करण्याकरता नाही. विरोधी पक्षाचेच काम अखंड करण्यासाठी नाही, तर आमची सरकार बनवण्याचीही भूमिका, आकांक्षा आहे. तुम्ही असे सांगा की, किती वर्षांमध्ये तुम्ही सरकार बनवू शकाल असे तुम्हाला वाटते?" असा त्यांनी प्रश्न केला. त्यावर पू. बाबासाहेब म्हणाले, "मी काही ज्योतिषी नाही रे. एखाद्या ज्योतिषाला विचार". त्यांची बोलण्याची तशी पद्धती असे. श्री. शेवडे म्हणाले, "तसे नाही, पण साधारण अंदाज?" त्यावर बाबा म्हणाले, "असे पहा. तू जरा इंग्लंडचा इतिहास वाच. ब्रिटिश लेबर पार्टीची स्थापना केव्हा झाली आणि पहिल्या प्रथम निर्भेळ बहुमत ब्रिटिश लेबर पार्टीला कोणत्या वर्षी मिळाले, हे तू वाच. म्हणजे तुला अंदाज करता येईल."

परंतु त्या वेळी पू. बाबासाहेबांचे जे वय होते ते लक्षात घेता हे उघड होते की, शेड्यूल कास्ट्स फेडरेशन या पार्टीचे साधन किंवा माध्यम म्हणून उपयोग केल्यानंतर आपण आपल्या हयातीतच प्राईम-मिनिस्टर होऊ शकू, अशा प्रकारची शक्यता त्यांच्यासारख्या बुद्धिमान माणसाला वाटली नसेल हे आम्ही समजू शकत होतो.

आणि जर आपल्या जीवनकाळात या माध्यमाच्या द्वारे, आपण सत्तेवर येण्याची शक्यता नसेल, तर हे माध्यम बिल्ड-अप करण्याकरता, संघटित करण्याकरता इतका जिवाचाआटापिटा कशासाठी करायचा, हा सुद्धा एक व्यावहारिक विचार त्यांना सुचायला पाहिजे होता. परंतु तो विचार काही त्यांना सुचला नाही.

## तत्त्वनिष्ठ व्यवहार

त्यानंतर दुसरा असाच एक प्रसंग झाला. मे १९५४ च्या पहिल्या आठवड्यात भंडारा-पोटनिवडणूक होती. त्या वेळेला त्या रिझर्व्ह मतदारसंघात एक रिझर्व्ह व एक जनरल असे काँग्रेसचे दोन्ही उमेदवार उभे होते. विरोधी बाजूला रिझर्व्हकरता बाबासाहेब, जनरलकरता दुसऱ्या एका अ.भा. पार्टीचे एक मोठे उमेदवार होते. पक्षाचे नाव घेण्याची आवश्यकता नाही. कारण आज तो पक्ष महाराष्ट्रात अस्तित्वात नाही. त्या श्रेष्ठ पुरुषाचे नाव घेण्याचे कारण नाही. कारण ते आज राजकारणात नाहीत. परिस्थिती थोडक्यात अशी होती की, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या लोकांनी दुसरे मतकोणालाही दिले, नॉन काँग्रेसला, तर हा दुसरा मनुष्य तर निवडून येईल. पण बाबासाहेब राखीवमधून निवडून येणार नाहीत. कारण ज्या पार्टीचे ते उमेदवार होते त्या पार्टीची ख्याती याकरिता दुसऱ्याशी समझोता झाल्यानंतर दुसऱ्यांची मते आपल्या पेटीमध्ये पटकावणे, हीच कला त्यांना माहीत असे. पण आपली मते दुसऱ्याकरिता डायव्हर्ट करण्याची काळजी ते घेत नसत. हा अनुभव एकदा मुंबईला आल्यामुळे सर्वांच्या मनात असे होते की, इथे पॅक्ट करण्यात काही अर्थ नाही.

काय करायचे म्हणून बैठक बसली. मी एक छोटा कार्यकर्ता म्हणून त्या वेळेला उपस्थितहोतो. फार जोरजोरात कार्यकर्त्यांनी आपली मते मांडली. त्यांनी मांडले की, "पहा, दुसरे व्होट यांना दिले तर ते काँग्रेसचे श्री.....निवडून येणार. बाबासाहेब पडतील. तेव्हा आपले दुसरे व्होट जाळायला पाहिजे." [तेव्हा आमच्या विदर्भात एक भाषा होती - कुणालाच मत न देणे म्हणजे जाळणे.] अशी चर्चा चालू होती. ती बाबांनी ऐकली. ते बैठकीत येऊन बसले. ते म्हणाले, "काय चर्चा चालली आहे?" मंडळींनी सांगितले, "दुसरे व्होट जाळायला हवे. ते जाळले नाही तर तुम्ही पडणार!"

त्या वेळी अत्यंत खंबीरपणे त्यांनी सांगितले की, "असे पहा, मी घटना निर्माण केली आहे. मी हे म्हणू शकत नाही आणि सहन करू शकत नाही की, घटनाबाह्य असे वर्तन

माझ्या अनुयायांनी करावे. दुसरे व्होट तुम्ही जाळावे असे मी म्हणणार नाही. मी त्याला परवानगी देणार नाही. घटनाबाह्य वर्तन मी सहन करणार नाही. आणि तसे न केल्याने मी इलेक्शन हरलो तरी चालेल. परंतु तुम्हाला दुसरे व्होट जाळायची परवानगी मी देणार नाही.'' आणि खरोखरच निकाल असाच आला. ते दुसरे सद्गृहस्थ निवडून आले. बाबा पडले. इलेक्शन जिंकण्याचा इतका सोपा मार्ग उपलब्ध असतानासुद्धा. केवळ घटना त्यांनी तयार केली, इतकेच नव्हे तर ते एक स्पिरिटही होते. ही जी तत्त्वनिष्ठा होती, त्या तत्त्वनिष्ठेमुळे हे काही निराळ्या प्रकारचे व्यक्तिमत्त्व आहे, असे वाटायला लागले.

## दूरदृष्टीची झेप

आणि तिसरी एक मनावर इम्प्रेशन देणारी घटना धर्मचक्र-प्रवर्तनाचे वेळी घडली. कार्यकर्त्यांची त्या वेळी बैठक झाली शाम हॉटेलमध्ये. भारतीय बौद्धजन समितीच्या शाखेचे कार्यवाह श्री. वामनराव गोडबोले हे जरी औपचारिकरीत्या या बैठकीचे आमंत्रक होते, तरी वास्तविकरीत्या ही बाबांच्या सर्व प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक होती. धर्मांतराचे आदले दिवशी म्हणजे दि. १३ ऑक्टोबर १९५६ च्या रात्रीचा हा प्रसंग—त्या ठिकाणी चहा आणि पोह्याच्या बशा देणारा कार्यकर्ता म्हणून मी तेथे उपस्थित होतो. त्या ठिकाणी चर्चा झाली. पू. बाबा म्हणाले, ''आपण धर्मपरिवर्तन करत आहोत; पण एकूण आपली काय योजना आहे ती समजावून घेतली पाहिजे.'' त्यांनी ती कार्यकर्त्यांना सांगितली. ते म्हणाले, ''आपले जे काही सिद्धांत आहेत त्याकरता फार मोठा बेस [Base] तयार होणे आवश्यक आहे''. अर्थात् त्या बैठकीत त्यांनी सिद्धांत वगैरे काही सांगितले नाहीत, हे साहजिकच होते. कारण असे आहे की, तिथे बसलेले हे सगळे त्यांचे सहकारी होते. वर्षानुवर्षे, दशकानुदशके ज्यांनी बाबासाहेबांच्या हाताखाली काम केले असेच प्रमुख कार्यकर्ते होते. पण बाबा असे म्हणाले, ''आपले जे सिद्धांत आहेत त्यासाठी बेस तयार व्हायला पाहिजे. त्यासाठी आपल्याला आपली व्यूहरचना ध्यानात घ्यायला पाहिजे. भविष्याच्या दृष्टीने.''

ही व्यूहरचना कशी—तर म्हणाले, ''शेड्यूल कास्ट्स् हा जो भाग आहे, तो, सामाजिक दृष्टीने आपला आहेच. आपण आता बौद्ध मतांचा स्वीकार करणार आहोत. शेड्यूल कास्ट्स्मधील काही लोक बौद्ध होतील, बौद्ध शेड्यूल्ड कास्ट्स् आपले म्हणून राहतील व जे बौद्ध मत घेणार नाहीत, असे शे.का.चे लोकही पूर्वीपासून आपले आहेतच; पण बौद्धमत हे केवळ शेड्यूल्ड कास्टपुरते ठेवायचे नाही, तर शे.का.च्या बाहेरही त्याचा प्रचार करायचा आहे. जे शेड्यूल्ड कास्ट नाहीत पण बौद्धमतांविषयी ज्यांना 'अपील' आहे असेही त्यामुळे आपल्याकडे येतील, व 'नॉन शेड्यूल्ड कास्ट् बुद्धिस्ट' असाही वर्ग आपल्याकडे तयार होईल. म्हणजे [१] बुद्धिस्ट शेड्यूल्ड कास्ट [२] शेड्यूल्ड कास्ट नॉन बुद्धिस्ट व [३]

नॉन शेड्यूल्ड कास्ट बुद्धिस्ट, अशा प्रकारचे वर्ग उत्पन्न होतील आणि आपण नवीन पार्टीचीही स्थापना करतो आहोत. या पार्टीचे काही सिद्धांत आहेत. जे प्रगत, पाश्चिमात्य लोकशाहीच्या सिद्धांतांच्या आधारावर आहेत.

''मला माहीत आहे कीं, तुम्हाला धर्मापेक्षा राजकारणात अधिक उत्साह वाटतो. परंतु मला राजकारणापेक्षा धर्मात विशेष रस वाटतो. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनने दलितवर्गात स्वाभिमान व आत्मप्रतिष्ठा निर्माण केली आहे. परंतु दलित-वर्गीयांनी आपल्यामध्ये व इतर समाजामध्ये एक मोठी भिंत उभी केली आहे. परिस्थिती अशा थराला आली आहे की, अस्पृश्य वर्गातील उमेदवारांना इतर लोक मते देत नाहीत आणि ते स्वतः सुद्धा दुसऱ्या पक्षांतील उमेदवारांना मते देत नाहीत. तेव्हा त्यांनी ज्या लोकांना दलितांच्या गाऱ्हाण्याविषयी सहानुभूती आहे, त्यांच्या सहाय्याने एक राजकीय पक्ष स्थापावा आणि दुसऱ्या पक्षांतील नेत्यांबरोबर काम करण्याचा प्रयत्न करावा. आता परिस्थितीचा आढावा घेण्याची वेळ आलेली आहे/ या आपल्या नव्या पक्षाचे सिद्धांत ज्यांना पटताहेत, असे राजकीय क्षेत्रांतील लोकही आपल्याजवळ येतील. त्यांतील काही शेड्यूल्ड कास्ट्स्चे असतील. काही शेड्यूल्ड कास्ट्स्च्याबाहेरचे असतील. काही बौद्धमत मानणारे असतील, काही बौद्धमत न मानणारे असतील. म्हणजे आपल्याजवळ असेही गट आणखी तयार होतील की, जे नॉन शेड्यूल्ड कास्ट, नॉन बुद्धिस्ट, रिपब्लिकन्स आहेत. असेही गट असतील, की, जे नॉन शेड्यूल्ड कास्ट, नॉन्-रिपब्लिकन, बुद्धिस्ट आहेत. तेव्हा एक धर्ममत, एक राजकीय मत व एक सामाजिक गट, या तिघांचे जितके काही निरनिराळे परम्युटेशन्स, कॉम्बिनेशन्स होऊ शकतील त्या सर्वांना धरून निरनिराळ्या प्रकारचे लोक आपल्याजवळ येतील. त्यामुळे कमी अधिक प्रमाणात आपल्या सिद्धांतांना, अनुकूल असा एक सोशल बेस तयार होईल.'' हा विषय त्यांनी समजावून सांगितला, त्याच वेळेला हा इशाराही दिला होता की, ''असे होऊ नये की, एक सामाजिक युनिट म्हणून तोच गट, धर्माच्या नावाखाली तोच गट, व राजकीय पक्ष म्हणूनही तोच गट.''

ही ऑक्टोबर १९५६ ची गोष्ट आहे. त्या वेळची त्यांची प्रकृती, त्यांचे वय वत्यांनी सांगितलेली ही व्यूहरचना हे सर्व ऐकल्यावर असे वाटत होते की, ही इतकी [लाँग रेंज] व्यूहरचना आणि त्यातून जी फलप्राप्ती व्हायची आहे, ती पहायला आपण राहणार नाही हे त्यांना माहीत असलेच पाहिजे; पण हे माहीत असताना सुद्धा एक व्हिजन समोर असल्यामुळे, एक ध्येय समोर असल्यामुळे, आपण त्याचं फल पाहण्याकरता जिवंत राहू अथवा न राहू, पण ते ध्येय सिद्ध व्हायला पाहिजे. म्हणून हा म्हातारा गृहस्थ इतका आटोकाट प्रयत्न करून राहिलेला आहे, सुखाचा जीव दुःखात घालतो आहे. वास्तविक आमच्या बऱ्याचशा राजकीय मित्रांचं म्हणणं असं आहे की, अती व्यावहारिक शहाणपणाचा

मार्ग हाच आहे की प्रौढ वयामध्ये आंब्याचं, बेलाचं, कवठाचं झाड माणसानं लावू नये, कारण त्याची फळे आपल्या जीवनकालात आपल्याला उपभोगता येणारनाहीत. हा व्यावहारिक शहाणपणाचा मार्ग सोडून उतारवयामध्ये, प्रकृती ठीक नसतानाहा मनुष्य इतका जीवाचा आटापिटा करतो आहे कशाकरता? तर एक लाँग रेंज व्हिजन समोर घेऊन. हे श्रेष्ठ व्यक्तिमत्वाचं प्रतीक आहे. अशा या काही घटनांमुळे डॉ.बाबासाहेबांविषयी एक श्रद्धेची भावना, आदराची भावना निर्माण झाली. पू.बाबासाहेबांचेविषयी आत्मीयता व आदर वाढण्याला आणखी एक कारण घडले ते म्हणजेत्यांचे संघटनात्मक विचार.

## संघटनात्मक व्यवहाराकडे लक्ष

पूज्य बाबासाहेबांची ही विशेषता होती की, फार उच्च स्तराच्या सिद्धांताचे प्रतिपादन करीत असतानाच व्यवहारातील बारीकसारीक संघटनात्मक तपशीलाकडेही त्यांची पूर्ण दृष्टी असे.

उदाहरणार्थ-दि. १४ ।७ ।१९५२ रोजी मुंबई येथील दामोदर हॉलमध्ये भरलेल्या सभेत बोलताना इमारत-फंडाच्या पैशाविषयी ते म्हणाले, ''आपल्या लोकांनी जी रक्कम दिलेली आहे, त्यापैकी निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांनी, संस्थांनी व व्यक्तींनी २५ रु. किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम दिली आहे, अशांची २५,७०९ रु. ४ आ.एवढी रक्कम आहे. २५ रु. पेक्षा कमी देणारांची रक्कम १००० रु. आहे व जिचा तपशील समजला नाही अशी ५,००० रु. रक्कम आहे. या पाच हजार रुपयांचा तपशील का समजला नाही? तर लोकांनी नेलेली पावतीपुस्तकं परत आणून दिली नाहीत, म्हणून समजला नाही. त्या पावती-पुस्तकांत आणखीही पैसा जमा झाले असण्याचा संभव आहे व हे जास्त जमलेले पैसे लोकांनी खाल्ले असा संशय उत्पन्न होणेही साहजिक आहे. तरी हा संशय नाहीसा करण्यासाठी लोकांनी नेलेली सर्व पावती-पुस्तके राहिलेल्या पैशांसह परत केली पाहिजेत. पुस्तके परत न करणे किंवा जमलेले पैसे न देणे ही फसवणूक आहे व कायद्याने अशा फसवणुकीला गुन्हा ठरविला आहे, हे सर्वांनी लक्षात ठेवावे.

''शिकल्या-सवरलेल्या लोकांना या प्रसंगी मला दोन शब्द सांगावयाचे आहेत—गीरब जनतेने दिलेल्या पैशांचा हिशेब त्यांनीव्यवस्थित ठेवावा व एका पैचीही अफरातफर होणार नाही याची काळजी त्यांनी घ्यावी. सार्वजनिक पैशाचा हिशेब त्यांनी व्यवस्थित ठेवून ते, जनतेत वेळोवेळी दाखवणे यासारखे पवित्र कार्य दुसरे नाही. तसेच सार्वजनिक पैशांचा अपहार करणे यासारखे नीच कृत्य दुसरे नाही.''

## कार्यकर्त्यांशी हितगुज

दुसऱ्या एका प्रसंगी त्यांनी पुढील सूचक उद्‌गार काढले—''मला पुष्कळ लोक विचारतात, तुम्ही भाषणे का करीत नाही? संदेश का देत नाही? मी भाषणे करीत नाही व

संदेश देत नाही याचाअर्थ असा नव्हे, की मला तुमच्याबद्दल काही काळजी वाटत नाही. काळजी नाही, कळकळ नाही अगर तुमचे भले व्हावे असे मी इच्छित नाही असे नव्हे. प्रसंग ओळखून काम करणे भाग आहे. शत्रू कोण? मित्र कोण? कोण्या प्रसंगी काय केले पाहिजे? या सर्व गोष्टींची चाचणी करणे भाग आहे. अशा स्थितीत स्तब्ध बसून विचार करणे, याशिवाय गत्यंतर नव्हते.''

दुसऱ्या कुणीतरी परिश्रमपूर्वक तयार केलेल्या आयत्या बिळावर नागोबा होणे ही अलग प्रक्रिया आहे व स्वतः संघटन व चळवळ उभी करणे ही अलग प्रक्रिया आहे. दुसऱ्या प्रकारचा पुढारी धरतीशी संबंध ठेवून असतो व त्यामुळेच कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष व्यावहारिक मार्गदर्शन करण्याची क्षमता त्याचे ठायी असते. या दृष्टीने कार्यकर्त्यांशी बाबासाहेबांनी केलेल्या हितगुजांचा काही भाग केवळ नमुना म्हणून प्रस्तुत करीत आहे.

''आपलं घर सोडून दुसऱ्याच्या हवेलीत शिरणे मोठा मूर्खपणा आहे.आपली झोपडी शाबूत राखा. तसे न झाल्यास ब्राह्मणेतर पक्षांप्रमाणे आपली स्थिती झाल्याशिवाय राहणार नाही. ब्राह्मणेतर पक्षांची काय दुर्दशा झाली? १९३२ सालपर्यंत आम्ही संगनमताने काम करीत होतो, त्या वेळी काही ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना वाटले की काँग्रेसबाहेर राहून उपयोग नाही. आत शिरून, आतून पोखरून काँग्रेसचा किल्ला फोडता येईल. बाहेरून फोडता येणार नाही, या समजुतीने ते काँग्रेसमध्ये शिरले. मी त्यांना पुष्कळदा बजावून सांगितले; परंतु त्यांनी माझं ऐकलं नाही. आपण आत शिरलो ही भयंकर चूक झाली. पुन्हा कितपत बांधू शकतील याबद्दल मला शंका आहे. आम्ही झोपडी मोडून समझोता करावयाचा हे मला बिलकुल पसंत नाही. झोपडी मोडून आम्ही काही करणार नाही.

''जे मिळेल ते पदरात पाडून घ्यावे आणि अधिकाकरिता मागणी करावी अशी आपली वृत्ती असावी. अशी एक म्हण आम्हांस माहीत आहे. 'नेसेन तर जरीची साडी, नाहीतर उघडीच बसेन' या म्हणीप्रमाणे वृत्ती असणे चांगले नाही. त्याच्यात काय पुरुषार्थआहे?

''कोणत्याही पक्षाशी सहमत होताना, मग तो पक्ष काँग्रेस असो, सोशालिस्ट असो, अथवा शेतकरी कामगार पक्ष असो, आपण आपली संघटना मोडता कामा नये. व्यक्तिगत दृष्ट्या माणसाला किंमत नसते. आज मला काँग्रेस-गटात व राजकारणात जो मान आहे त्याचे एकमेव कारण माझ्यामागे शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची संघटना आहे हेच होय. ज्या दिवशी या संस्थेचा आधार नष्ट होईल त्या दिवशी राजकारणात मला किंमत उरणार नाही. म्हणून देशरक्षणाची भावना मनात बाळगून भावी राजकारणातील शत्रु-मित्रांचे नाते ओळखून, स्वत्व राखून आपण सावधानतेने शे.का. फेडरेशनच्या नेतृत्वाखाली पावले टाकली पाहिजेत.

"मनुष्याने स्वार्थच करीत न राहाता थोडाफार परमार्थही केला पाहिजे. यासाठीच हे सर्व मी करीत आहे. मला हे धर्माने शिकवले. नुसते पोट भरले म्हणजे सर्व काही झाले असे समजू नका. पोट काय, रांडरळी सुद्धा भरते. घर प्रपंच सांभाळा. मात्र समाजकार्यालाही मदत करा.

"आता आपण आपले मन पवित्र केले पाहिजे. आपला सद्‌गुणांकडेओढा असला पाहिजे. अशा रीतीने आपण धार्मिक बनावयास पाहिजे. आपण शिकतो म्हणजे सर्व काही झाले असे नाही. शिक्षणाचे महत्त्व आहे यात शंका नाही. मात्र शिक्षणाबरोबरच माणसाचे शीलही सुधारले पाहिजे. शीलाशिवाय शिक्षणाची किंमत शून्य आहे. ज्ञान हे तलवारीसारखे आहे. समजा, एखाद्या माणसाच्या हाती तलवार आहे, तिचा सदुपयोग करावयाचा की दुरुपयोग करावयाचा हे त्या माणसाच्या शीलावर अवलंबून राहील. तो त्या तलवारीने एखाद्याचा खूनही करील किंवा एखाद्याचा बचावही करील. ज्ञानाचे तसेच आहे. एखादा शिकलेला माणूस, त्याचे शील चांगले असेल तर तो आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी करील. परंतु त्याचे शील चांगले नसेल तर तो आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांचे अकल्याण करण्याकडेही खर्च करील. शील हे धर्माचे मोठे अंग आहे. शिकलेली माणसे नुसती पोटभरू असून भागणार नाही. ज्यांना स्वार्थापलीकडे काही दिसत नाही, ज्यांना थोडाही परमार्थ करता येत नाही, ती माणसे नुसती शिकली म्हणून काय झाले? त्याचा दुसऱ्याला उपयोग काय?

"तव्याचा जाय वरसा मग तो सहजच होई आरसा." शिक्षणाचा उपयोग असा झाला पाहिजे.

"कार्यकर्त्यांची अशी भावना झाली आहे, की निवडणूक म्हणजेच राजकारण. निवडणुकांशिवाय राजकारणाला दुसरा काही अर्थच नाही. अशीही भावना झालेली दिसते! म्हणूनच निवडणुकीच्या वेळी, तिकिट मिळविण्यासाठी सर्वांची धडपड चाललेली असते आणि निवडणुका संपल्या की जो तो स्वस्थ बसतो. परंतु समाजाचे आयुष्यात राजकारण हे एक अल्पकारण आहे. राजकारण म्हणजेच काही सर्वस्व नव्हे. खरे पाहिले तर राजकारणापेक्षाही महत्त्वाचे जे काय आहे ते शेष अन्य आहे. समाजाची जी काही उन्नती होते ती केवळ राजकारणाने होत नाही. समाज-उन्नतीची अनेक कारणे आहेत. सामाजिक, आर्थिक, या बाबी काही कमी महत्त्वाच्या नाहीत. समाजाची सर्वांगीण उन्नती होण्यासाठी या सर्व बाबींकडे सारख्याच प्रमाणात कार्यकर्त्यांनी लक्ष देणे जरूर आहे. राजकारण हीच एक महत्त्वाची बाब आहे अशी भावना झाल्यामुळेच निवडणुकीच्या वेळी तिकिट मिळवण्यासाठी धडपड करणे, तिकिट न मिळाल्यास समाजात फाटाफूट करणे, निवडणुकीत पडल्यास निराश होऊन स्वस्थ झोपणे आणि निवडून आल्यास असेंब्लीमध्ये

जाऊन तोंड बंद करून बसणे, एवढेच कार्य आहे असा कार्यकर्त्यांचा समज होत असतो.

"मी व्यक्तिशः कोणत्याही कार्यकर्त्यांवर प्रेम करीत नाही. प्रेम एका कार्यावरच असते. जो कार्य करील तोच मला आवडतो.

"इलेक्शन ही क्रिकेटची मॅच आहे. क्रिकेटमध्ये पराभव झालेली टीम गाशा गुंडाळून स्वस्थ बसत नाही. ती पुन्हा दुसऱ्या वर्षी नव्या जोमाने खेळावयास प्रारंभ करते. असा आशावाद आपण ठेवला पाहिजे.

"माझ्या मताप्रमाणे जर कारभार चालला तरच मी संस्थेत राहीन अशी प्रवृत्ती फार वाईट.

"राजकारणात भांडणे होतात, ती विसरून जाण्याची सवय ठेवली पाहिजे. त्या भांडणाचे झाड मनात वाढते, हा स्वभाव बरा नव्हे; माझे हृदय निर्मळ आहे. माझेसुद्धा इतरांशी मतभेद असतात, परंतु मी ते लवकर विसरतो. माणसाचे मन फुलाप्रमाणे स्वच्छ असावे लागते.

"आमच्या फेडरेशनमध्ये बरेच बाजारबुणगे जमा झाले आहेत. त्यांना आता फेडरेशन मोडावयाची असेल तर त्यांनी आत्ताच तेथून चालते व्हावे. त्यांना तीत जागा नाही. दोन दगडांवर पाय ठेवू नयेत. फेडरेशनचे झाड लवकर फळे देणार नाही, त्याला फळे उशीरा येणार आहेत; पण ती चिरकाल टिकणारी आहेत. जे झाड लवकर येते व फळे लवकर लागतात ते झाड लवकरच लयास जाते. असले झाड आमच्या उपयोगाचे नाही. तेव्हा ज्यांना लवकर फळे पाहिजेत त्यांनी तिकडे जावे.

"ज्याचे अंगी धैर्य नाही तो पुढारीच होऊ शकत नाही. जो मनुष्य मरावयास तयार होतो तो कधीच मरत नाही आणि जो मरणास भितो तो अगोदरच मेलेला असतो असे समजावे.

"राजकारणच कोणास करावयाचे असेल, तर राजकारणाचा चांगला अभ्यास केला पाहिजे. अभ्यासाशिवाय जगामध्ये कोणाला काहीच साधता येणार नाही. आपल्या समाजातील प्रत्येक कार्यकर्त्याने, राजकीय, धार्मिक, आणि आर्थिक अशा सर्व प्रश्नांचा चांगला बारकाईने अभ्यास केला पाहिजे. ज्यांना पुढारी व्हायचे असेल, त्यांनी पुढाऱ्याची कर्तव्य-कर्मे, पुढाऱ्याची जबाबदारी काय आहे याची जाणीव ठेवावयास पाहिजे. कारण आपल्या समाजातील पुढाऱ्यांवर अत्यंत मोठी जबाबदारी आहे. इतर समाजांच्या पुढाऱ्यांसारखी आपल्या समाजातील पुढाऱ्यांची स्थिती नाही. इतर पुढाऱ्यांचे काय? सभेत जाणे, लांबलचक भाषणे करणे, टाळ्या मिळवणे आणि शेवटी हार गळ्यात घालून घरी येणे. एवढेच काम इतर पुढाऱ्यांकडे असते. आपल्या समाजातील पुढाऱ्यांना हे करून भागणारनाही. चांगला अभ्यास करणे, विचार करणे, समाजाच्या उन्नतीसाठी स्वतः रात्रंदिवस अंगमेहनत करणे हे आपल्या तरी पुढाऱ्याला करावे लागेल, तरच तो लोकांचे थोडे फार भले करू शकेल. तोच पुढारी ठरू शकेल. तुम्हाला वाटते पुढारी होणे फार सोपे

आहे; पण माझ्या मते पुढारी होणे फारच अवघड काम आहे. मला स्वतःला पुढारीपण फार जड वाटते. कारण इतरांसारखे माझे पुढारीपण नाही. मी ज्या वेळी चळवळ सुरू केली त्या वेळी कसल्याही तऱ्हेची संघटना नव्हती. मलाच स्वतःला सर्व काही करावे लागे. संघटना करावयाची म्हटली म्हणजे मला स्वतःलाच ती करावी लागत असे. वर्तमानपत्र काढावयाचे म्हटले तर मलाच काढावे लागे. म्हणूनच 'मूक नायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' वगैरे वृत्तपत्रे मला स्वतःलाच काढावी लागली. प्रेस चालवायचा म्हटले तर मला स्वतःलाच प्रेसची जुळवाजुळव करावी लागली. थोडक्यात सांगायचे म्हटले तर मला शून्यातून सर्व निर्माण करावे लागले.

'राग दोन प्रकारचे असतात. एक द्वेषमूलक, दुसरा प्रेममूलक. जोकसाई असतो तो कुऱ्हाड घेऊन जातो; त्याचा राग हा द्वेषमूलक असतो. आईने आपल्या मुलाला चापट मारली, तर तिला कोण काय म्हणेल? तिचा राग असतो तो प्रेममूलक असतो. मुलाने सदाचारी व्हावे म्हणून आई मुलाला मारत असते. माझा रागही प्रेममूलक आहे. तुम्ही समतेने वागावे म्हणून मी राजकारणास शिव्या देतो."

कार्यकर्ता, संघटक वा प्रचारक कोणत्याही संघटनेचा किंवा पक्षाचा असला तरी वरीलप्रमाणे असलेले अत्यंत व्यावहारिक मार्गदर्शन त्याला उपयुक्तच वाटणार. ही उपयोगिता स्थलकालनिरपेक्ष आहे. हे विचारधन उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. डी. के. पोखर्णीकर व श्री. मा. फ. गांजरे धन्यवादास पात्र आहेत.

भारताच्या घटनाकाराने कार्यकर्त्यांच्या मनःस्थितीचा सूक्ष्म मागोवा घेऊन इतके तपशीलवार व्यावहारिक मार्गदर्शन करावे, ही गोष्ट अतिशय कौतुकास्पद आहे. हे सर्व वाचताना मला गरुडभरारीची आठवण होत असे. आकाशात सर्वांत उंच भरारी मारणारा पक्षी म्हणजे 'गरुड' होय. परंतु तो आपले घरटे मात्र जमिनीवरच बांधतो, हवेत बांधत नाही. बाबासाहेबांनी कार्यकर्त्यांना केलेले मार्गदर्शन याच मासल्याचे आहे. ते सर्वच समूहातील कार्यकर्त्यांना उपयुक्त आहे. मी स्वतः संघाचा प्रचारक असल्यामुळे अशा प्रकारच्या मार्गदर्शनाची महती प्रकर्षाने समजू शकतो. आजच्या सार्वजनिक जीवनात इतर पुढाऱ्यांचे विचार व वर्तन पाहिल्यानंतर बाबासाहेबांच्या उपदेशाचे महत्त्व मला आगळेच वाटले.

## स्तर जाणून व्यवहार

जे स्वतः मागासलेल्या वर्गातील नाहीत त्यांना पू. बाबासाहेबांचे बोलणे, वागणे, फटकळपणाचे व तुसडेपणाचे वाटणे स्वाभाविक आहे. ज्या मंडळींना घेऊन पुढे जावयाचे होते, त्या मंडळींचा स्तर ध्यानात घेऊनच त्यांच्याशी बोलणे, वागणे भाग होते. प्रारंभीक काळातील शे.का.फे. चे नागपूरचे अध्यक्ष श्री. दशरथ पाटील यांचेशी पू. बाबासाहेबांचा

प्रेमसंवाद चालला असता तिथे उपस्थित राहाण्याची संधी मला मिळाली. 'लाडवण' या शब्दाच्या व्युत्पत्तीविषयी चर्चा चालली होती. त्या वेळी आपले विचार प्रकट करताना पू. बाबासाहेबांनी अशा काही खास वऱ्हाडी शब्दांचा प्रयोग केला की मलाही आश्चर्य वाटले. घटनासमितीतील त्यांच्या विद्वत्ताप्रचुर भाषणांची प्रशंसा मी ऐकली होती; पण तेच गृहस्थ आमच्या खास वऱ्हाडी शब्दांचाही प्रयोग तितक्याच सफाईने करू शकतात हे पाहून आनंद झाला. ज्या लोकांचा संग्रह करावयाचा असेल त्यांच्याच पातळीवर जाऊन बोलणे-वागणे केल्याशिवाय संग्रह होणार तरी कसा?

दुसरी गोष्ट ही की, त्यांचे विचार इतके सुस्पष्ट व मौलिक असत की, त्यांचे योग्य प्रकटीकरण करावयाचे झाल्यास निर्भीडपणा व प्रसंगी अप्रियता पदरी घेणे अपरिहार्यच होत असे. एक घाव दोन तुकडे, असाच प्रकार बहुधा होत असे. त्यामुळे गैरसमज उत्पन्न होतो याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच एका प्रसंगी पुढील स्पष्टीकरण देणे त्यांना आवश्यक वाटले. ''जरी माझा स्वभाव तापट असला आणि सत्ताधारी लोकांशी अनेक प्रसंगी माझे खटके उडाले असले तरी मी भारताविषयी परदेशात काही कडवट बोलेन, असा चुकीचा ग्रह त्यांनी करून घेऊ नये. मी देशाशी केव्हाही विद्रोहकेला नाही. देशाचे हितच हृदयात सतत बाळगले. गोलमेज-परिषदेच्या वेळी देशाच्या हिताच्या दृष्टीने मी गांधींच्याही पुढे २०० मैल होतो.''

दुसऱ्या एका प्रसंगी ते म्हणाले, ''पुष्कळ हिंदू मला आपला शत्रू समजतात; परंतु माझे वैयक्तिक मित्र ब्राह्मण समाजातलेसुद्धा आहेत. जे ब्राह्मण माझ्या लोकांना कुत्र्यामांजरापेक्षा वाईट रीतीने वागवतात, त्यांच्या त्या समाजद्रोही कृत्यावर कोरडे ओढण्याचे माझ्या नशिबी आले आहे. त्या परिस्थितीला माझा नाइलाज आहे.''

वास्तविक त्यांच्या सर्वच कार्यांत ब्राह्मणांनी व इतर उच्च वर्णीयांनी वारंवार बरेच साहाय्य केले व याविषयी बाबासाहेबांनी वारंवार सार्वजनिक रीत्या कृतज्ञता प्रकट केली. व्यक्तिगत संबंध व सामाजिक समस्येचे विश्लेषण या दोन अलग-अलग गोष्टी आहेत; परंतु फटकळपणामुळे निष्कारण गैरसमज निर्माण झाले.

## मुस्लिमांविषयी मते

त्यांच्या (Thoughts on Pakistan) या ग्रंथाने निर्माण केलेले वादळ सर्वांच्या ध्यानात आहे. हिंदुत्वाच्या समर्थकांना या ग्रंथामुळे मोठाच धक्का बसला. तत्कालीन भावनोत्कट वातावरणात त्यांच्याही विचारामागे काही तर्क असू शकेल, ही गोष्ट ध्यानात घेणे कुणालाही शक्य झाले नाही. पू. बाबासाहेबांच्या या ग्रंथातील निष्कर्षाशी मी पूर्णपणे असहमत आहे, परंतु त्यांनी दिलेली तर्कपरंपरा सर्वांनी व विशेषतः हिंदुत्व-समर्थकांनी

ध्यानात घेण्यासारखी आहे. "मुसलमानांच्या मनावर लोकशाहीचा प्रभाव पडत नाही. मुसलमानांना जर कशाविषयी प्रबळ आस्था वाटत असेल तर ती धर्माविषयी. त्यांचे राजकारण, हे मुख्यतः धर्मनिष्ठ असते. मुसलमान समाज सुधारणांचा विरोधक आहे. सर्व जगभर तो प्रतिगामी वृत्तीनेच वागत आहे. मुसलमानांना मुसलमान धर्म हा जागतिक धर्म वाटतो. पण 'इस्लाम' चे बंधुत्व हे सर्वव्यापक, सार्वत्रिक नाही. हे बंधुत्व मुसलमान समाजाच्या अनुयायांपुरतेच मर्यादित असते. मुसलमानेतरांविषयी त्यात तिरस्कार आणि शत्रुत्वच असते.ज्या देशावर मुसलमान राज्य करीत नाहीत ती त्यांची शत्रूभूमी. म्हणून इस्लामी धर्म खऱ्या मुसलमानाला, हिंदुस्थान ही मातृभूमी आहे, नि हिंदू आपला इष्टमित्र आहे, असे विचार त्याच्या मनासही शिवू देणार नाही." असे बाबासाहेबांचे स्पष्ट मत आहे. आक्रमक वृत्ती ही मुसलमानाला मिळालेली नैसर्गिक देणगी आहे. हिंदूंच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन ते गुंडगिरीचा अवलंब करतात. वास्तविक मुसलमानांच्या प्रतिगामी व अराष्ट्रीय वृत्तीविषयी त्यांनी आणखी बरेच काही लिहिले होते; परंतु ते फार बोचरे असल्यामुळे त्यांच्या काही मित्रांनी त्यांना तो भाग गाळावयास लावला.

मुसलमान जोपर्यंत मुसलमान आहे, तोपर्यंत त्याला हिंदुस्थानच्या राष्ट्रशरीरात आत्मसात करून घेणे शक्य होणार नाही, मुसलमानांसहीत अखंड हिंदुस्थान कधीही एकजीव होणार नाही, असे त्यांना वाटे. भर समुद्रात जहाज बुडून जाऊ नये, म्हणून जरूरीपेक्षा ज्यादा असलेला माल फेकून द्यावा. जहाजाचा पाण्यावरील भाग तळाला जाऊ नये म्हणून काळजी घेतली पाहिजे. भारतात मुसलमान राहतील तोपर्यंत प्रबळ मध्यवर्ती सरकार निर्माण होऊ शकणार नाही, असे त्यांचे मत होते.

## हिंदूंच्या पचनशक्तीविषयी शंका

पू. बाबासाहेबांच्या मनात नेहमीच असा विचार असे की, मुसलमानांना आपण आत्मसात करू शकणार नाही. त्यामुळे एक विदेशी तत्त्व राष्ट्रशरीरात ठेवण्याऐवजी त्याला वेगळे करणे बरे. पुढे काश्मीर व्हॅलीविषयी असाच विचार त्यांनी प्रगट केला असता या विषयांवर त्यांचेशी बोलण्याचा योग मला आला होता. त्या वेळी पू. बाबा आवेशाने म्हणाले, "मी तुम्हा लोकांपेक्षा देशभक्तीत तिळमात्रही कमी नाही; परंतु अंतर तितकेच आहे की, जोडा कुठे चावतो आहे याचा मी सतत अनुभव घेत आहे आणि तुम्हा लोकांना 'जोडा चावतो आहे' याचेही भान नाही. 'काश्मीर व्हॅली' हिंदुस्थानात ठेवायची असेल तर तेथील सर्व मुसलमानांना हिंदुसमाजाने आत्मसात करून घेतले पाहिजे. तसे न झाले तर It will be a constant thorn by our side. (आपल्या डोक्यावर टांगती तलवार सतत असावी अशी अवस्था होईल.) वास्तविक आम्ही तुमचेच असूनही, आतापर्यंत तुम्ही

आम्हालाही पचवू शकला नाही. काश्मीर-व्हॅलीतील सर्व मुसलमानांना हिंदू समाजात पचविण्याची शक्ती सवर्ण हिंदूंमध्ये आहे काय? तुमच्या पचनशक्तीचा अंदाज घेऊन मी म्हटले आहे की, हे Foreign Element (परकीय घटक) देशाच्या आत असण्यापेक्षा देशाच्या बाहेर असणे बरे.''

काही झाले तरी त्यांचा तोही निष्कर्ष मला पटणे शक्य नव्हते. मी तसे बोलूनही दाखवले. अर्थात् एका अजाण मुलाच्या बोलण्याइतकेच महत्त्व त्यांनी माझ्या मताला दिले. परंतु त्याही वेळी हे वाटल्यावाचून राहिले नाही की, पू. बाबांनी काढलेला निष्कर्ष म्हणजे हिंदू समाजाच्या सध्याच्या पचनशक्तीवरील दुःखद भाष्य होय.

फेब्रुवारी १९४२ मध्ये मुंबई येथील वागळे हॉलमध्ये Thoughts on Pakistan विषयी बाबासाहेब म्हणाले, ''ज्यांना पाकिस्तान हा चर्चेचा विषय आहे असे वाटत नाही, त्यांच्याशी वाद घालण्यात अर्थ नाही त्यांना जर पाकिस्ताननिर्मिती अन्यायाची वाटत असेल तर होऊ घातलेले पाकिस्तान ही त्यांना अत्यंत भयंकर अशी गोष्ट वाटेल. इतिहास विसरा, असे लोकांना सांगणे हे चूक आहे. जे इतिहास विसरतात तेइतिहास घडवू शकणार नाहीत. भारतीय सैन्यातील मुसलमानांचे वर्चस्व कमी करून ते सैन्य एकजीव आणि निष्ठावंत करणे ही गोष्ट शहाणपणाची आहे—आपल्या मायभूमीचे संरक्षण आम्ही करूच करू! पाकिस्तान मिळाले तर मुसलमान सर्व हिंदुस्थानवर आपले साम्राज्य पसरवतील असा खोटा समज करून घेऊ नका. हिंदू त्यांना धुळीस मिळवतील. स्पृश्य हिंदूंशी काही मुद्द्यावर माझे भांडण आहे, हे मी मान्यच करतो, परंतु तुमच्यासमोर मी अशी प्रतिज्ञाकरतो की, आपल्या देशाचे स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठी मी आपला प्राणही अर्पण करीन.''

पू. बाबांच्या काही लाक्षणिक निषेधात्मक कृत्यामुळे सनातनी मंडळींना खेद होणे व राग येणे स्वाभाविकच आहे. परंतु त्यांनीही पू. बाबांची मनोवृत्ती समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## निखळ ध्येयवादी

कुणाही कलाकाराला आपल्या कलाकृतीविषयी, साहित्यिकाला आपल्या साहित्याविषयी एक प्रकारचे अपत्यप्रेम वाटणें स्वाभाविकच आहे. पू. बाबासाहेबांनी घटना निर्माण केली, जगाने त्यांना 'आधुनिक भारताचा मनू' या पदवीने गौरविले, ही त्यांच्या जीवनातील फार मोठी उपलब्धी होती. तरीपण ते यामुळे हुरळून गेले नाहीत, कारण ते कट्टर ध्येयवादी होते. घटनानिर्मितीचे कार्यसुद्धा त्यांनी याच दृष्टीने केले की, त्यामुळे त्यांच्या मूळ ध्येयाला मदत होईल व मान्यता प्राप्त होईल. परंतु तसे होणार नसेल तर केवळ 'आधुनिक

मनू' या गौरवाने त्यांना समाधान होणारे नव्हते. स्वतः तयार केलेल्या घटनेविषयीसुद्धा त्यांना आंधळे अपत्यप्रेम नव्हते. त्यातील उणीवांची त्यांना पूर्ण जाणीव होती. उदाहरणार्थ, त्यांचे पुढील निरीक्षण पाहाः 50

"On the 26th January, 1960 we are going to enter into a life of contradictions. In politics, we will have equality, and in social and economic life, we will have inequality. In politics, we will be recognising the principle of 'one man and one vote, and one vote, one value. In our social and economic life, we shall, by reason of our social and economic structure, continue to deny the principle of one man, one value.' How long shall we continue to live this life of contradictions? How long shall we continue to deny equality in our social and economic life? If we continue to deny it for long, we will do so only by putting our political democracy in peril. We must remove this contradiction at the earliest possible moment, or else those who suffer from inequality, will blow up the structure of political democracy which this assembly has so labouriously built up."

["दि. २६ जानेवारी १९६० रोजी आपण एका परस्परविरोधी तणाव असलेल्या जीवनात प्रवेश करणार आहोत. राजकारणात आपल्याकडे समता असेल आणि सामाजिक व आर्थिक जीवनात असमानता आढळेल. राजकारणात दरडोई एक मत व त्याचे एकच मूल्य हे तत्त्व आपण मान्य करू. आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनात मात्र आपल्या सामाजिक घडणीमुळे एक माणूस, एक मूल्य हे तत्त्व नाकारीत राहू. आपण असे विसंगतींनी भरलेले जीवन किती दिवस जगत राहाणार? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनातील समानतेला आपण किती काळनकार देणार? फार काळ आपण समानता नाकारीत राहिलो तर आपली राजकीय लोकशाहीच आपण धोक्यात आणू. म्हणून ही विसंगती आपण लौकरात लौकर दूर केली पाहिजे. अन्यथा या घटना-समितीने मोठ्या परिश्रमांनी निर्माण केलेला लोकशाही साचा विषमतेचा बळी झालेले लोक उद्ध्वस्त करून टाकतील."]

आपल्या ध्येयसिद्धीच्या आड येणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर निर्दय हल्ला चढविणे हा त्यांच्या ध्येयनिष्ठ स्वभावाचाच एक भाग होता. त्यांनी मनुस्मृती जाळल्यामुळे मनुभक्त नाराज होणे स्वाभाविक आहे. परंतु ते पू. बाबासाहेबांची मनोरचना समजून न घेताच नाराज झाले आहेत.

स्वतः तयार केलेली भारताची घटनासुद्धा आपल्या ध्येयाच्या आड येत असेल तर आपण तिलाही जाळून टाकू असे ते म्हणत असत. यावरून त्यांच्या मनोरचनेविषयी अंदाज करता येतो.

दिनांक २-९-५३ रोजी विधिमंडळात दिलेल्या भाषणात ते म्हणाले, ''बहुमतवाल्या सरकारपक्षाने विनंती केल्यावरून मी घटना बनविली. त्याला माझा नाइलाज होता. लोकमतानुसार मला घटना बनवावी लागली. भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यांच्या संरक्षणाचे खास अधिकार राज्यपालाला नसल्यामुळे त्यांचे योग्य संरक्षण झाले नाही व होऊ शकणार नाही. म्हणूनच मीच पहिल्याप्रथम ही राज्यघटना जाळून टाकीन.''

जो मापदंड त्यांनी मनुस्मृतीला लावला तोच स्वतः तयार केलेल्या 'भीमस्मृती'लाही लावला, हे ध्यानात घेतले तर आपले मूल्यांकन पूर्णपणे बदलते.

## धर्म हाच विचारांचा आधार

पूज्य बाबासाहेबांच्या सर्व विचारांचा आधार धर्म हाच होता. अर्थात् या धर्माच्या नावावर ब्राह्मणांनी बहुजनसमाजाचे शोषण केले. त्यांना ज्ञान व प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्याची संधी नाकारली व त्यांनी अखंड धार्मिक गुलामीत राहून ब्राह्मणांचा निहित स्वार्थ सदैव सुरक्षित ठेवावा अशी व्यवस्था केली. ही त्यांची ब्राह्मणांविरुद्ध व 'ब्राह्मणी धर्मा' विरुद्ध कटू टीकाही चालत असे. परंतु दोष ब्राह्मणांचा आहे. मूळ धर्म-कल्पनेचा नाही हेही ते स्पष्ट करीत. ते म्हणत-

''जगातील काही कम्युनिस्ट वगळले तर असा एकही मनुष्य आढळणार नाही की ज्याला धर्म नको आहे. त्याचप्रमाणे धर्म आम्हालाही पाहिजे आहे. पण तो सद्धर्म हवा. असा सद्धर्म म्हणजे जेथे लोक समसमान राहतील, सर्वांना सारखीच संधी मिळेल, तोच खरा धर्म; बाकीचे सारे अधर्मच होत.

''हिंदूंच्या शिकवणीप्रमाणे जर सर्वत्र बृहत्तत्त्व आहे, तर मग महारात, मांगात चांभारातही ते असले पाहिजे. मग हिंदुधर्मात अशी असमानता का? भगवान बुद्धांचा अंत होऊन २ हजार वर्षे लोटली. पण अजूनही हा धर्म जोमाने फोफावतो आहे. त्याला कुणी शास्ता नाही की, सर्वाधिकारी नाही. अंतकाळी भगवानांना त्यांच्या शिष्याने विचारले, 'भगवन् तुम्ही गेल्यानंतर तुमच्या पश्चात् या धर्माचे काय होणार? याला कुणी तरी शास्ता ठेवा.' तेव्हा भगवानांनी उत्तर दिले की, 'माझ्या गैरहजेरीत धर्म हाच तुमचा शास्ता आहे. तो जर पाळीत नसाल तर त्याचा काय उपयोग? विशुद्ध मनाने घेतलेला धर्म हाच तुमचा शास्ता.'

''रशियामध्ये प्रॉपर्टीसाठी यादवी गाजली आहे. जगाचा व्यवहार धर्माने चालला आहे. एखाद्या बाळंत झालेल्या बाईला सांगितले की, 'हे मूल तुझा शत्रू आहे; तू त्याला दूध पाजू

त्यांच्या मनातील हिंदु धर्म आणि धर्मसंकल्पना यांच्यांतील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे की नाही? अन्यथा मनुस्मृती कशाला जाळली असती?



नकोस. त्यामुळे तू अशक्त होशील. म्हातारी होशील. तुझे सौंदर्य कमी होईल. हे मूल तुझा काळ ठरणार आहे,' तर त्या मुलाची आई हे ऐकेल काय? कितीही दुःख झाले, कितीही आजारी असली, तरी ती मुलाला-दूध पाजीलच. मुलाचे प्रतिपालन करणे हा तिचा धर्म आहे. जगाचें सर्व व्यवहार धर्माने चालले आहेत.

"पुण्यातील लोक अर्धपोटी राहून जेवणाचे डबे घेऊन जात असतात. बिरयानी व पुलाव अशा प्रकारचे जेवण असते. पण ते लोक कर्तव्यबुद्धीने व प्रमाणिकपणे डबे पोहोचते करतात. म्हणून धर्म हा सर्वांनी पाळला पाहिजे. तो सद्धर्म पाहिजे. अधर्म नको. ते सुकर्म पाहिजे. दुष्कर्म नको.

"एकदा बुद्धाला विशाख नावाच्या शिष्याने प्रश्न विचारला की,धर्म म्हणजे काय? 'मलीन मनाला साफ करणे हाच धर्म होय' असे उत्तर मिळाले. अस्पृश्यता काही रस्त्यात पडलेला धोंडा नाही की, समाजसुधारकांना बाजूला फेकून देता येईल. जेव्हा आपला मनोधर्मबदलेल तेव्हाच आपला धर्म बदलेल."

**चारित्र्याची महती**

"शिक्षणाचे महत्त्व आहे हे निःसंशय. परंतु त्याहूनही अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे चारित्र्य, शील. हे नसेल तर केवळ शिक्षण आत्मघातकीसुद्धा होऊ शकते. चारित्र्य, शील यांचे उगमस्थान धर्मेहेच आहे."

दिनांक ६ ।२ ।१९५४ रोजी श्री. अत्रे यांच्या 'महात्मा फुले' चित्रपटाचे उद्‌घाटन करताना पू. बाबा म्हणाले, "आज देशात चारित्र्यच उरलेले नाही. आणि ज्या देशाला नीतिमत्ता नाही, त्या देशाचे भवितव्य अतिशय खडतर आहे. जवाहरलाल नेहरू तुमचे मुख्यमंत्री असोत वा मोरारजी देसाई असोत; तुमच्या भविष्यात काळोखच भरला आहे. देशाचे मंत्री देशाचा उद्धार करीत नाहीत. तर धर्म ज्याला उत्तम रीतीने समजला आहे तोच देशाला तारू शकेल. महात्मा फुले अशा धर्मसुधारकांपैकी होते. विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री या धर्मतत्त्वांनुसार प्रत्येकाने आपले चारित्र्य बनविले पाहिजे. करुणेशिवाय विद्या बाळगणाराला मी कसाई समजतो. करुणा म्हणजे माणसा-माणसावरचे प्रेम. याच्याही पुढे मनुष्य गेला पाहिजे."

दिनांक १३ ।६ ।१९५३ रोजी वरळी कॅम्प, मुंबईला महिलामंडळासमोर भाषण देताना पू. बाबा म्हणाले, "प्रत्येक माणसाची काया, वाचा व मने अशी त्रिशुद्धी झाली पाहिजे...........आपण धर्मासाठी सत्याग्रह केला. धर्मांतराचा ठराव केला. सर्व काही केले. आता आपण आपले मन पवित्र केले पाहिजे. आपला सद्‌गुणांकडे ओढा असला पाहिजे. अशा रीतीने आपण धार्मिक बनावयास पाहिजे. आपण शिकलो म्हणजे सर्व काही झाले असे नाही. शिक्षणाचे महत्त्व आहे यात शंका नाही. मात्र शिक्षणाबरोबरच माणसाचे

शीलही सुधारले पाहिजे. शीलाशिवाय शिक्षणाची किंमत केवळ शून्य आहे. ज्ञान हे तलवारीसारखे आहे. समजा, एखाद्या माणसाच्या हाती तलवार आहे. तिचा सदुपयोग की दुरुपयोग करावयाचा, हे त्या माणसाच्या शीलावर अवलंबून राहील. तो त्या तलवारीने एखाद्याचा खूनही करील किंवा एखाद्याचा बचावही करील. ज्ञानाचेही तसेच आहे. एखादा शिकलेला माणूस त्याचे शील चांगले असेल तर आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी करील. परंतु त्याचे शील चांगले नसेल, तर तो आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांचे अकल्याण करण्याकडेही करील. शील हे धर्माचे मोठे अंग आहे.''

## दुराचारांवर बंधन

''धर्म हा दुराचरणावर नियंत्रण ठेवतो. येथे उदाहरणादाखल तुमच्या भाषेत एकच गोष्ट सांगतो. बैलगाडीला दोन चाके, दोन बैल, गाडा तसेच हाकणारा मनुष्य वगैरे सर्व असते. गाडीला वंगण असते. चाकाला खीळ असेल तर बैल गाडा ओढतील त्याचप्रमाणे मनुष्याच्या पापी, दुराचारी वर्तनाला बंधन म्हणजे धर्म. धर्माचे बंधन असल्याशिवाय कार्य टिकू शकत नाही.''

बाबासाहेब भौतिक—आर्थिक प्रगतीचे महत्त्व जाणत होते. धर्म व अर्थ या दोन्हीही गोष्टी माणसाला अत्यंत आवश्यक आहेत. हे ते मान्य करीत. परंतु त्याचबरोबर ते आग्रहपूर्वक हेही प्रतिपादीतअसत की, ''नुसत्या अर्थाने अनर्थ होईल. अर्थामध्ये धर्म हवा आहे.''

पददलितांना तर धर्म फार आवश्यक आहे, असे ते म्हणत. ''जगात प्रथम धर्माची आवश्यकता खालच्या लोकांना वाटू लागली. रोमन, इटालियन साम्राज्यात ख्रिस्ती-धर्म प्रथम गरीबांनीच स्वीकारला.''

सारांश, त्यांची प्रेरणा विदेशातून नव्हती. शुद्ध भारतीय होती. धर्म हेच त्याचे अधिष्ठान होते. मात्र तो सद्‌धर्म असावा. असद्‌धर्म असू नये असा त्यांचा आग्रह होता.

## स्वातंत्र्य-रक्षणास अग्रस्थान

वस्तुतः शेकडो वर्षे पददलित राहून आता नवीनच जागृत होऊ लागलेल्या समाजाची स्वाभाविक प्रतिक्रिया जागृती, चीड, प्रतिकार व आक्रमण याच स्वरूपाची असते. त्यांतून देशाच्या एकात्मतेला तर तडा जातोच, पण सामान्य शांतता-सुव्यवस्थाही भंग पावते. असे लोक बाबासाहेबांच्याही अनुयायांत होते. परंतु बाबात्यांना समजावून सांगत की, ''हा मार्ग आत्मघातकीपणाचा आहे. काही लोक सांगतात की, दलित फेडरेशन चढाव करीत नाही. चढाव म्हणजे काय? चढावाचे राजकारण आम्हाला पचणार आहे काय? आम्ही चढाव केला तर त्याचा तुम्हांलाच त्रास होईल. आम्ही तुरुंगात जाऊन बसलो तर तुम्हांला ते लोक

छळतील. 'तुम्ही आंबेडकरांना मदत करता काय? बेट्यांनो, तुमचे पाहून घेऊ.' असे म्हणून तुम्हांलाच त्रास देतील. यापेक्षा तुम्ही कष्ट करा.....आपले मन निर्मळ पाहिजे. त्यामुळे आपसांतील मतभेद नाहीसे होतात."

दि. ११-१-१९५० ला मुंबईच्या नरेपार्कमध्ये सार्वजनिक सत्कारालाउत्तर देताना बाबासाहेब म्हणाले, "आजच्या राजकारणात मी आता विशेष जाऊ इच्छित नाही. परंतु काही गोष्टी अवश्य सांगाव्याशा वाटतात.

"पूर्वी आपले राजकारण शत्रुत्वाच्या पायावर चाललेले होते. माझ्या दृष्टीने पूर्वीचे अस्पृश्यवर्गाचे सर्व पुढारी थोड्याशा संकुचित दृष्टिकोनाने पाहात होते व तसेच वागत होते. मीही या दोषाला थोडा-बहुत पात्र होतोच. पण हा राजकारणाचा रोख आता बदलला पाहिजे.

"आता आपण एक गोष्ट पक्की ध्यानात ठेवली पाहिजे की, आपण आपल्या लोकांचे, आपल्या समाजाचे हित पाहात होतो. ते तर पुढे चालू ठेवलेच पाहिजे. परंतु त्याबरोबरच आपल्या देशाला मिळालेले स्वातंत्र्य कसे राखून ठेवता येईल, याचाही विचार केला पाहिजे. या देशाला पूर्वी स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही पारतंत्र्यात पिचत पडावे लागले आहे. अगोदर मुसलमानांनी व नंतरइंग्रजांनी आपले स्वातंत्र्य आपल्यापासून हिरावून घेतले होते. स्वातंत्र्याची वरच्या वर्गाला जितकी जरूरी आहे; तितकीच खालच्या वर्गालाही आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीतून आपण मुक्त झालो आहोत. पण आता पुन्हा परकीयांच्या गुलामगिरीत पडण्याचा प्रसंग आपल्यावर आला तर ती गोष्ट दुर्दैवाची ठरेल. म्हणून या देशाच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करणे हेही प्रत्येकाने आपले परम कर्तव्य मानले पाहिजे."

## कम्युनिझमला विरोध

भारतातील पददलितांचे डोळे कम्युनिस्टांच्या यशाने दिपून जाण्याची शक्यता ध्यानात घेऊन त्यांना बाबासाहेब सांगतात,

"Do not be allured by communist success. I am quite confident that if we all become one-tenth as enlightened as the Buddha was, we bring about the same result by the method of love, of justice and good will."

["साम्यवाद्यांच्या यशाची क्षणभरही भुरळ पडू देऊ नका. मला पूर्ण विश्वास आहे की, भगवान बुद्धाला लाभला त्याच्या एक दशांश ज्ञानाचा प्रकाश जरी आपणाला लाभला तरी तोच परिणाम आपण प्रेम, न्याय आणि सद्भाव या मार्गाने निष्पन्न करू शकू."]

पू. बाबासाहेब लोकशाहीचे कट्टर समर्थक होते. ते म्हणत, "ज्या सरकारी पद्धतीत लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक स्थित्यंतरे रक्तपाताशिवाय घडवून

आणण्यात येतात ती लोकशाही." कम्युनिझमला त्यांचा विरोध होता याचे हेही एक कारण होते. विशुद्ध भौतिकतावादाचे त्यांना वावडे होते.

भौतिक सुखात डुंबत असणाऱ्या समाजाला आणि व्यक्तिला ते हळूच म्हणत की, "भौतिक सुख म्हणजे काही मानवाचे सर्वस्व नव्हे, त्याने मानवाची दुःखे हरण होणार नाहीत. मनुष्य केवळ भाकरीवर जगत नाही; त्याला सुसंस्कृतीची गरज आहे."

मार्क्सवाद्यांना ते सांगत :-

"मनुष्य केवळ भाकरीवर जगत नाही. त्याला मन आहे. त्या मनाला विचारांचे खाद्य पाहिजे. धर्म मनुष्याच्या हृदयात आशा निर्माणकरतो. त्याला काम करावयास प्रवृत्त करतो. पददलितांच्या उत्साहावर हिंदू धर्माने पाणी ओतले आहे, म्हणून धर्म बदलण्याची आवश्यकता मला पटली आणि मी बौद्ध धर्म स्वीकारला. बौद्ध धर्माला काळ आणि वेळ यांचे बंधन नाही. तो कुठल्याही देशात भरभराट पावू शकेल. ज्या देशातील लोक मानसिक संस्कारापेक्षा मालकीलाच जास्त महत्त्व देतात त्या देशाशी मी संबंध ठेवणार नाही. जर हिंदू धर्माने दलितवर्गाला शस्त्र धारण करण्याचे स्वातंत्र्य दिले असते, तर हा देश कधीही गुलामगिरीत पडला नसता."

नागपूरला दीक्षा-समारंभाचे वेळी बोलताना ते म्हणाले, "मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला धर्म ही अत्यंत आवश्यक वस्तू आहे. मला माहीत आहे की, कार्ल मार्क्सच्या वाचनामुळे एक पंथ निघाला आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे धर्म म्हणजे काहीच नाही. त्यांना धर्माचे महत्त्व नाही. त्यांना सकाळी ब्रेकफास्ट (न्याहरी) मिळाली, त्यांत पाव, मलई, लोणी, कोंबडीची टांग, वगैरे असले, पोटभर जेवण मिळाले, निवांत झोप मिळाली की, सगळे संपले. हे त्यांचे तत्त्वज्ञान! मी त्या मताचा नाही."

सप्टेंबर १९३७ मध्ये त्यांच्या अध्यक्षतेखाली मसूरला दलितवर्गांची जिल्हा-परिषद झाली. तीत भाषण करताना ते म्हणाले, "मी कम्युनिस्टांना जाऊन मिळण्याची सुतराम शक्यता नाही. स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी मजुरांचे शोषण करणाऱ्या कम्युनिस्टांचा मी पक्का शत्रू आहे."

पुस्तकी कम्युनिस्टांना या देशाची नाडीच कळली नाही, हे सांगताना ते विचारतात—

"Can it be said that the prolotariat of India poor as it is, recognised no distinctions except that of the rich and the poor? Can it be said that the poor in India recognise no distinctions of caste or creed, high or low? If the fact is that they do, what unity of front can be expected from such a prolotariat in the action against the rich? How can there be a revolution if the prolotariat can not present a

united front?" (Annihilation of Caste, P. 18)

["भारतातील श्रमजीवी वर्ग, जरी तो गरीब असला तरी, श्रीमंत आणि गरीब यांव्यतिरिक्त अन्य कोणताही भेद जाणत नाही, असे म्हणता येईल काय? भारतातील गरीब लोक जाती किंवा पंथ, उच्च किंवा नीच असा भेद मुळीच मानत नाहीत, असे आपण म्हणू शकू काय? वर्गभेदाव्यतिरिक्त अन्य भेदही ते मानतात ही जर वस्तुस्थिती असेल, तर अशा श्रमजीवी वर्गाला श्रीमंत वर्गाविरुद्ध या संघर्षांत एकच आघाडी कशी उभारता येईल? जर श्रमजीवी वर्ग एक आघाडीकरू शकला नाही, तर क्रांती कशी घडून येईल?] (ॲनिहिलेशन ऑफ कास्ट, पृष्ठ १८)

तरी पण सध्या शोषणावर आधारलेली रचना देशात प्रचलित आहे. त्यामुळे कम्युनिस्टांचे फावू शकते, त्याची त्यांना जाणीव होती, व तसे घडू नये अशी चिंताही ते व्यक्त करीत.

बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाचा मूलस्रोत धर्मात होता. संवैधानिकता व लोकशाही हा त्यांचा स्वभावच बनला होता. भगवान बुद्ध, महात्मा कबीर व महात्मा ज्योतिबा फुले ते तिघे त्यांचे गुरु होते. विद्या, विनय व शील ही तीन त्यांची उपास्य दैवते होती. अशी मानसिक पार्श्वभूमी असलेला पुढारी अस्पृश्यांतून निर्माण झाला हे आपल्या देशाचे थोर भाग्यच म्हटले पाहिजे.

**निष्कारण गैरसमज**

पू. बाबांच्या भूमिकेविषयी प्रचलित असलेले कित्येक गैरसमज निराधार होते असे दिसून येते. उदाहरणादाखल एक दोन गोष्टींचा उल्लेख करतो.

महाराष्ट्रात अगरकर आदी मंडळींनी सर्व भर समाजसुधारणेवर दिला व राजकीय कार्यापेक्षा समाजसुधारणेला अधिक महत्त्व दिले. याचा अर्थहा नव्हता की, त्यांना स्वराज्याची तळमळ नव्हती. परंतु हे न जाणता अशा समाजसुधारकांविषयी त्या काळात बरेच गैरसमज पसरविण्यात आले होते. बाबांचीही तीच गोष्ट आहे.

पू.डॉ. आंबेडकर स्वराज्यविरोधी होते असे म्हणणे चुकीचे आहे. त्यांचे स्पष्ट मत् होते की,

"It is only in a Swaraj Constitution that you stand, any chance of getting political power in your hands without which you cannot bring salvation to our people. Consult your best interests and I am sure you will accept Swaraj as your goal."

["स्वराज्यातील घटनेनुसारच राजकीय सत्ता हस्तगत करण्याची काही शक्यता तुम्हाला आहे. सत्ता हस्तगत केल्याखेरीज आपल्या जनतेचा उद्धार तुम्हाला करता येणार

नाही.आपल्या जास्तीत जास्त कल्याणाचा विचार करा आणि माझी खात्री आहे की, स्वराज्य हेच आपले उद्दिष्ट म्हणून तुम्ही स्वीकाराल.'']

राउंड टेबल कॉन्फरन्सचे वेळीही त्यांनी ही भूमिका स्पष्ट केली.

"We must have a government in which, men in power will give their undivided allegiance to the best interest of the country; we must have a government in which men in power knowing where obedience will end and resistance will begin, will not be afraid to amend the social and economic code of life which the dictates of Justice and expediency call for."

[''आपल्याला असे सरकार आवश्यक आहे की, ज्यातील सत्ताधारी लोक देशाचे हितसंबंध सर्वश्रेष्ठ मानून त्यासाठीच आपली पूर्व निष्ठा समर्पित करतील. आपल्याला असे सरकार हवे की, ज्या सरकारातील सत्ताधारी व्यक्तींना नियमांचे पालन कोठे संपुष्टात येईल व प्रतिकाराला प्रारंभ केव्हा होईल,ह्याचे आकलन असेल; आणि जे न्याय व व्यावहारिक शहाणपणा यांनाअनुसरून आर्थिक आणि सामाजिक कायद्यांच्या संहितेत परिवर्तन करण्यास कचरणार नाहीत.'']

स्वराज्य हे त्यांचेही ध्येय होते. परंतु त्या स्वराज्यात व स्वराज्यातील घटनेत दलितांचे स्थान काय राहील, या प्रश्नाला ते अग्रक्रम देत.

**ध्वजासंबंधी पू. बाबासाहेबांची भूमिका**

आपल्या भगवद्ध्वजाविषयीची त्यांची भूमिका श्री.धनंजय कीर यांच्या शब्दांत समजावून घेणेही हितप्रद् राहील.

श्री. धनंजय कीर सांगतात, ''याच सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना समितीच्या ध्वज-समितीचे एक सभासद होते. घटना-समितीने घटनेचा मसुदा करण्यासाठी एक लेखन-समिती नेमून डॉ. आंबेडकरांना तिचे अध्यक्ष नेमण्याचा दिवस बराच दूर होता. डॉ. आंबेडकर हे ३ जुलै १९४७ रोजी दिल्लीहून मुंबईला आले होते. त्या वेळी राष्ट्रध्वज कोणत्या स्वरूपाचा असावा याची चर्चा सर्वत्र सुरू होती. या बाबतीत काही महाराष्ट्रीयांनी आणि मुंबई प्रांतिक हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेतली व ध्वजाचा रंग भगवा असावा असे सुचविले. जर वजनदार गोटातून या बाबतीत चळवळ होऊन प्रभावी लोक-मत निर्माण झाले, तर आपण ध्वजाचा रंग भगवा असावा ही सूचना समितीत उचलून धरू असे त्यांनीअनंतराव गद्रे, प्रबोधनकार ठाकरे व मराठा मंदिराचे गावडे यांना अभिवचन दिले. १० जुलैला डॉ. आंबेडकर दिल्लीला जावयास निघाले तेव्हा सांताक्रूझ विमानतळावर मुंबई प्रांतिक हिंदुसभेचे नेते व काही मराठा पुढारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे

विमानात बसावयास जात असता त्यांना एक भगवा ध्वज अर्पण केला. त्यावेळी ते म्हणाले, "भगव्या ध्वजासाठी चळवळ झाली तर त्याला आपण पाठिंबा देऊ." त्यावेळी हिंदुसभेचे नेतेबाबासाहेब बोले व अनंतराव गद्रे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "एका महाराच्या मुलाकडून घटना-समितीवर ध्वज लावण्याची अपेक्षा तुम्ही करत आहांत, नाही का?" पुढील घटनाचक्र सर्वपरिचित आहे. त्यामुळे भगव्या ध्वजासाठी, बाबासाहेबांनी सांगितले त्याप्रमाणे बाहेरून आंदोलन करणे अशक्यच झाले होते.

## समरसतेवर भर

आपल्या सार्वजनिक जीवनाच्या प्रारंभिक अवस्थेत पू. बाबासाहेबांनी समरसतेच्या भावनेवरच भर दिला होता. केवळ सवर्णविरोधी विद्वेषाची भावना फलदायी होणार नाही, याची त्यांना जाणीव होती. श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड व श्रीमंत शाहू छत्रपती यांचे हृदय अस्पृश्यांकरिता कसे तुटत होते याची त्यांना प्रत्यक्ष माहिती होती. आर्यसमाज, प्रार्थनासमाज, ब्राम्होसमाज, सत्यशोधक समाज, थिऑसफिकल सोसायटी आदी संस्थांच्या नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी अस्पृश्योद्धाराकरिता चालविलेल्या कार्याची त्यांना जाणीव होती. सवर्ण हिंदूंच्या सार्वजनिक पुढाऱ्यांनी अस्पृश्यता निवारणाची केलेली घोषणा त्यांचे ध्यानात होती. त्यामुळे दि. २० जुलै १९२४ या दिवशी बहिष्कृत हितकारणी सभेची मुंबई येथे स्थापना करताना त्यांनी सभेचे अध्यक्ष-उपाध्यक्ष या नात्याने श्री. चिमणलाल सेटलवाड, रँगलर परांजपे, श्री. बाळासाहेब खेर आदी तथाकथित उच्चवर्णीयांना ठेविलेहोते. इतरही उच्चजातीय हिंदूंचा समावेश या संस्थेत करून घेतला होता. त्यासंबंधी पू. बाबासाहेबांनी असे स्पष्टीकरण दिले होतेकी, "ज्या वर्गाच्या सुधारणेसाठी संस्था स्थापन करावयाच्या त्या वर्गाचे किंवा तशाच परिस्थितीने गांजलेल्या लोकांचे कार्यकर्ते संस्थेत असल्याखेरीज संस्थेचे ध्येय व हेतू फलित होणे शक्य नाही. हे मान्य असले तरी ज्यांनी ही संस्था स्थापन केली आहे, त्यांना हे पक्के माहीत आहे की, वरिष्ठ वर्गातील सधन आणि सहानुभूती असलेल्या लोकांचे साहाय्य असल्याखेरीज अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीच्या अवाढव्य कार्यक्रमाची सिद्धी होणे केव्हाही शक्य नाही. तसे केले नाही तर स्वजनोद्धाराच्या महान् कार्याचे आपणच नुकसान केल्यासारखे होईल." हीच बाबासाहेबांची मूळ भूमिका होती. परंतु स्वतःला धर्माचे ठेकेदार समजणाऱ्या काही दुराग्रही लोकांच्या हठधर्मामुळे त्यांना पुढे दुसरी भूमिका घ्यावी लागली.

प्रत्यक्ष धर्मांतराच्या २०-२५ वर्षे पूर्वी धर्मांतराचीच चर्चा चालली असताना बाबांनी स्वा. सावरकर, डॉ. मुंजे, कुर्तकोटी शंकराचार्यआदी हिंदुत्ववादी पुढाऱ्यांच्या आग्रहावरूनच धर्मांतराकरता शीख मताची निवड केली होती. इस्लाम किंवा ख्रिस्ती मताचा स्वीकार केला तर सर्व धर्मांतरित मंडळी राष्ट्रविरोधी बनतील असे त्याही वेळी त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते.

हिंदुसभेच्या पुढाऱ्यांशीत्यांचे व्यक्तिगत संबंध चांगले होते. परंतु सनातनी समाजात त्यांची पकड नाही व ज्यांची पकड आहे ते वरील पुढाऱ्यांप्रमाणे दृष्टिकोन ठेवीत नाहीत ही त्यांची तक्रार होती. याच परिस्थितीमुळे वरिष्ठ समजल्या गेलेल्या मंडळींचे हृदयपरिवर्तनकरण्यात आपल्याला यश येत नाही याचे त्यांना दु:ख होत असे.

यथास्थितीवाद्यांच्या हट्टी दुराग्रहामुळे शेवटच्या दिवसांत बाबांनाही प्रतिक्रियात्मक भूमिका घ्यावी लागली हे खरे, परंतु मुळात त्यांची भूमिका समन्वयात्मक होती. याची अनेक उदाहरणे देता येतील. उदाहरणादाखल सन १९३० मध्ये त्यांनी प्रतिपादिलेली पुढील भूमिका पहा. भारतीय अल्पसंख्याक-आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एम्.एस्. बेग आणि सरसंघचालक पू. बाळासाहेब देवरस यांनी नुकतीच अशी सूचना केली की, अल्पसंख्याक-आयोगाचे ऐवजी 'राष्ट्रीय एकात्मता व मानवी अधिकार आयोगाची' [A National Integration-cum-Human Rights Commission] स्थापना करण्यात यावी. त्यांच्या या दृष्टिकोनाचे सर्वत्र स्वागत करण्यात आले. परंतु न्या. बेग यांच्या सूचनेपूर्वी ५४ वर्षे, त्या काळच्या अधिक विषम परिस्थितीतही पू. बाबासाहेबांनी पुढील उद्गार काढले होते, हे आज लोकांच्या ध्यानात नाही.

"To say that this country is divided by castes and creeds. and that it cannot be one united self-governing community unless adequate safeguards for protection of minorities are made as part of constitution. is a position to which there can be no objection. But minorities must bear in mind that although we are today divided by sects and atomised by castes our ideal is a United India. No demand from minority should, willingly sacrifice this ideal."

["हा समाज नाना जाती अन् नाना पंथ यांच्यामुळे विभाजित झाला आहे, आणि अल्पसंख्यांच्या संरक्षणाची पुरेशी घटनात्मक तरतूद केल्याखेरीज एकसंध, स्वयंशासित समाज या नात्याने उभा होऊ शकणार नाही, याबद्दल कोणाचा काहीच आक्षेप आसू नये. परंतु अल्पसंख्याकांनी लक्षात ठेवले पाहिजे की, आज नाना जाती आणि पंथ यांच्यामुळे आम्ही विभागलेले व लहान लहान तुकड्यांत वाटले गेलेले असलो तरी आमचे ध्येय एकसंध भारत हेच आहे. या उद्दिष्टाला करून-सवरून बाध आणणारी अशी कोणतीही मागणी अल्पसंख्याकांकडून पुढे येऊ नये."]

या भूमिकेतील संतुलन प्रशंसनीय आहे. यथास्थितिवाद्यांनी पू.बाबासाहेबांना निराश केले नसते तर त्यांच्या विद्वत्तेचा व कर्तृत्वाचा अधिक रचनात्मक लाभ देशाला होऊ शकला असता, हे यावरूनस्पष्ट होते.

## सामाजिक समतेची समस्या

भारतीय परिस्थितीत सामाजिक समतेचा प्रश्न किती गुंतागुंतीचा झाला आहे,

बहु-आयामी झाला आहे, याची सखोल कल्पना नसणाऱ्या स्वस्त राजकीय पुढाऱ्यांच्या भडक व उथळ प्रचारामुळे प्रश्नाची गुंतागुंत अधिकच वाढत चालली आहे. तथापि नवीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कुणीही विचारवंत जेव्हा समस्येविषयी चिंतन करू लागतो तेव्हा त्याने काढलेले निष्कर्ष दोन्ही पूजनीय डॉक्टरांच्या सुविचारित मतांना पोषक असेच असतात. उदाहरणार्थ, नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'Competing Equalities' या ग्रंथाच्या प्रारंभीच श्री. गॅलेंटर म्हणतातः-

आपल्या ग्रंथांत श्री. मार्क गॅलेंटर यांनी भारतांतील सामाजिक अन्यायाचा, त्याविरुद्ध झालेल्या विद्रोहाचा, व घटनेत दिलेले उद्दिष्ट प्राप्त करण्याकरिता आत्तापर्यंत झालेल्या कायदेशीर प्रयत्नांचा इतिहास आणि तदनुषंगाने उपस्थित झालेल्या प्रकरणांतील हायकोर्ट व सुप्रीम कोर्ट यांचे निवाडे दिलेले आहेत.

"Indian system of preferential treatment for historically disadvantaged sections of the population is unprecedented in scope and extent. India embraced equality as a cardinal value against background of elaborate, valued and clearly perceived inequalities. Her constitutional, policies to off-set these proceeded from an awareness of the entrenched and cuminulative nature of group inequalities. The result has been an array of programmes that I call, collectively, a policy of compensatory discrimination. If one reflects on the propensity of nations to neglect the claims of those at the bottom, I think it is fair to say that this policy of compensatory discrimination has been pursued with remarkable persistence and generosity if not always with rigour and effectiveness for the past thirty years."

["समाजातील जे वर्ग इतिहासकाळात नाडलेले राहिले त्यांना खास सवलती उपलब्ध करून देण्याची भारतीय पद्धती,व्याप्ती व विस्तार या बाबतीत अभूतपूर्व आहे. सुस्पष्ट, मूल्यात्मक आणि तपशीलांसह रूढ विषमतांच्या पार्श्वभूमीवर भारताने समानतेचे प्रधान मूल्य अंगीकारले. समाजातील विभिन्न गटांतील बद्धमूल विषमतांच्या जाणीवेतून त्या दूर करण्यासाठी भारताच्या राज्यघटनेतील धोरणांना जन्म लाभला. परिणामतः ज्याला मी भरपाई करणारा भेदभाव म्हणतो, अशा स्वरूपाच्या अनेक कार्यक्रमांची आखणी करण्यात आली, अगदी तळागाळाशी असलेल्या समाजगटांची उपेक्षा करण्याची राष्ट्राची प्रवृत्ती पाहिली, तर असे म्हणणे योग्य होईल की, गेल्या तीस वर्षांत भरपाईच्या भेदभावाचे धोरण लक्षणीय सातत्याने व उदारपणे राबविले गेले आहे.नेहमीच ते फार कडक व परिणामकारक झाले आहे, असे मात्र कदाचित् म्हणता येणार नाही."]

एक विदेशी विद्वान भारताच्या इतक्या गुंतागुंतीच्या अंतर्गत समस्येवर इतक्या

परिश्रमपूर्वक अध्ययन करतो आहे हे दृश्यच अतिशयकौतुकास्पद व प्रशंसनीय आहे. या प्रयत्नाबद्दल भारतीय त्याचेआभारी आहेत. परंतु या देशातील जनतेच्या नाडीवर हात नसल्यामुळे व निग्रोविषयींच्या अमेरिकन प्रयत्नांचा इतिहास मनाच्या पार्श्वभूमीत असल्यामुळे या प्रश्नाच्या खऱ्या मर्मापर्यंत ते पोहोचू शकले नाहीत. तरीपण संपूर्ण अध्ययनानंतर पुढील निष्कर्ष त्यांच्या मनात आला हेही कौतुकास्पदच आहे.

"Courts can avert the worst dangers by maintaining a precarious balance between competing commitments to formal equality and the compensatory justice, but they may be less capable of addressing problems of costs and ineffectiveness that plague such policies."

["सर्वसामान्य समता आणि भरपाईचा न्याय यांतून परस्परांवर कुरघोडी करू पाहाणाऱ्या ज्या मागण्या पुढे येतात, त्यांतील अवघड तोल सांभाळून सर्वस्वी अनिष्ट धोके न्यायालये टाळू शकतील. पण अशी धोरणे राबविताना जी किंमत द्यावी लागेल किंवा फलनिष्पत्तीच्या बाबतीत जो अपेक्षाभंग सोसावा लागेल त्यांना तोंड देण्याची पुरेशी क्षमता कदाचित् न्यायालये प्रकट करू शकणार नाहीत."]

नोकऱ्या, शिक्षण व सरकारी हुद्दे यांतील रिझर्वेशनच्या धोरणामुळे नुकत्याच उठलेल्या देशव्यापी वादळावरून हे "Problems of cost and ineffectiveness" [मोजावी लागणारी किंमत आणि परिणामशून्यता यांच्या समस्या] किती गंभीर व मोठे आहेत याची कल्पना येते. घटना, कायदा, न्यायालये, या मार्गाने सामाजिक न्यायाच्या व तदंतर्गत सामाजिक समतेच्या समस्येची उकल होऊ शकत नाही हे या ग्रंथावरून स्पष्ट होते.

अलीकडे आणखी एक ग्रंथ प्रकाशित झाला आहे त्याचे नाव आहे:- Equality and Inequality. Theory and Practice. याचे संपादन Sh. Andre Eeteill यांनी केले आहे. या क्षेत्रातील प्रथितयश विद्वानांच्या लेखांचा हा संग्रह आहे. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक या सर्वच पैलूंवर प्रकाश टाकण्याचा यात प्रयत्न आहे. केवळ कायद्याने किंवा घटनेने समता सिद्ध होणार नाही, हे त्यावरून स्पष्ट दिसते. The law cannot make up for deficiency of public education. [सार्वजनिक शिक्षणातील उणीवा कायद्याने दूर होऊ शकत नाहीत.] हा या ग्रंथाचा निष्कर्ष आहे. संपादकमहोदय आपला अभिप्राय व्यक्त करताना म्हणतात, "Whether Indians can make effective the ideals of equality or not will depend on the firmness with which they are able to apply themselves to the building of institutions."

["भारतीय लोक समतेचे आदर्श परिणामकारकरीत्या व्यवहारात आणू शकतात किंवा नाही, हे ते किती निर्धापूर्वक संस्थात्मक उभारणी करण्याच्या कामात लक्ष घालतात, यावर

अवलंबून राहील."]

जे निष्पक्ष व अभ्यासू वृत्तीने या प्रश्नाकडे पाहतात अशा तळमळीच्या विचारकांपैकी एका विद्वानाची प्रतिक्रिया इथे प्रस्तुत करतो. डॉ. शिवरामय्या यांचे पुढील उद्गार पहा:-

The difficulties are further compounded, because the basic law where the provisions of equality in the part on fundamental rights are at variance with those in the directive principles of state policy is itself riddled with contradictions. The contradictions are at least partly the result of the scarcity of resources which prevent the state from matching the obligations of disabilities with the creation of abilities without which the directive principles are merely mock at the very poor. There is no way in which the jobless can secure their right to work or the destitute obtain justice in the absence of provision for free legal aid."

["अडचणी आणखीच वाढल्या आहेत. कारण मूलभूतकायद्यातील मूलभूत हक्कांत समाविष्ट असलेल्या तरतुदी आणि शासनाच्या मार्गदर्शक तरतुदी यांत अनेक प्रकारे परस्पर विरोध आणि विसंगती आहेत. या विसंगती काही प्रमाणात तरी साधनसामुग्रीच्या चणचणीतून निर्माण झाल्या आहेत. कारण या चणचणीमुळे, एका बाजूने दुर्बळ घटकासंबंधीच्या कर्तव्याची पूर्ती वदुसऱ्या बाजूने त्यांच्यात गुणवत्तेची वाढ साधणे शासनाला शक्य होत नाही. अशी परिस्थितीतील मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे गरिबांची केवळ चेष्टा ठरते. काम नसलेल्यांनी कामाचा हक्क कसा मिळवावा किंवा निराधारांनी मोफत कायदेशीर मदतीच्या अभावी न्याय कसा मिळवावा, याचे उत्तरच गवसत नाही."]

"The balance between the meritorious and proportional concepts of equality postulated in Article 16 brings in its wake certain problems quite apart from the inherent incongruence between them. The right of equality of opportunity based on the meritorious concept exists in favour of the individual, whereas the protective discrimination exists in favour of collectivities. The former right is enforced by the courts, the latter is based on the policies of Legislatures and their implementation by executives. Conflicts arise out of the varying degrees of emphasis placed on these rights by the judicial and executive organs of the state."

["समतेच्या गुणवत्तेवर आधारलेल्या आणि विशिष्ट प्रमाण ठरवून देणाऱ्या कल्पनांतील जो समतोल कलम सोळामध्ये गृहीत धरलेला आहे त्यातून काही प्रश्न पुढे येतात. समान संधीच्या गुणवत्तेवर आधारलेला अधिकार व्यक्तीला न्याय देणारा आहे, तर राखीव जागा ठेवण्यातील भेदभाव विशिष्ट समूहाचा पक्षपाती आहे. पहिला अधिकार

न्यायालयाद्वारे पदरात पाडून घेता येतो. तर दुसरा अधिकार हा विधान-मंडळांची धोरणे व त्यांची शासनाकडून अंमलबजावणी यावर आधारलेला आहे. या अधिकारांवर जो कमीअधिक भरन्याय व अंमलबजावणी या दोन शासकीय अंगांकडून दिला जातो, त्यांतून संघर्षांचे प्रसंग उद्‌भवतात.'']

या ग्रंथाचे परीक्षण करताना श्री. शामलाल यांनी काढलेले पुढील उद्‌गार म्हणजे एक प्रकारे वर्ण्य विषयाचा समारोप होय. श्री. शामलाल म्हणतातः-

"They (i.e. the authors-contributers) are careful, however, to guard against seductive simplifications. The very purpose of their exercise is to show that things are far more tangled up, and therefore, far more impervious to simple remedies, than the rhetoric of those who cast themselves in the role of saviours of poor will admit." The facts of the situation here, once we have a hard look at them, turn out to be far more discerning than stock liberal Gandhian or Marxist remedies make allowance for."

[''या ग्रंथाचे लेखक सुलभ पण फसव्या निष्कर्षांपासून सावध आहेत. त्यांच्या सगळ्या खटाटोपाचा उद्देशच हा आहे की, परिस्थितीचा गुंता सामान्यतः आपण समजतो,त्यापेक्षा खूपच अवघड आहे, हे निदर्शनास आणून द्यावे. अर्थातच गरीबांचे कैवारी म्हणवून घेऊन ठराविक सुराची वक्तव्ये देणारे सांगतात तितक्या मार्गांनी हा प्रश्न सुटण्याजोगा नाही हे ध्यानात यावे. जर परिस्थितीचे नीट निरीक्षण केले तर वस्तुस्थितीअशी दिसते की, ठराविक साच्यांच्या उदार गांधीवादी अथवा मार्क्सवादी उपायांनी प्रश्नांची उकल करता येणार नाही. ती त्यापेक्षा पुष्कळ जटिल आहे.'']

## दूरगामी उपाययोजना

या चर्चेवरून हे स्पष्ट व्हायला अडचण पडू नये की, राजकीय म्हणजेच उथळ मार्गाने ज्याचे समाधान व्हावे असा हा प्रश्न नाही. राजकीय स्तरावर या दृष्टीने चोखाळलेले मार्ग व योजिलेले उपाय तात्कालिक फलदायी वाटले तरी संपूर्ण समतेचे लक्ष्य प्राप्त करण्याच्या दृष्टीने ते अपुरेच आहेत, अपुरेच राहतील. लक्ष्यप्राप्तीकरता गहन मौलिक चिंतन व त्याच्या प्रकाशात प्रदीर्घव्यावहारिक उपाययोजना यांची आवश्यकता आहे. यांच्या अभावी मते कदाचित मिळू शकतील, परंतु प्रश्न सुटणार नाही.

उपरिनिर्दिष्ट दोन्ही भारतीय महापुरुषांचे वैशिष्ट्य हेच होतेकी, संत तुकारामांप्रमाणेच त्यांची वृत्ती होती.

''सत्य-असत्याशी—मन केले ग्वाही ।
मानियले नाही—बहुमता ।।

त्यामुळे हे दोन्ही डॉक्टर "Seductive simplifications" [सुलभ भासणाऱ्या

फसव्या उपायांचा मोह] च्या प्रभावाखाली गेले नाहीत. मूलगामी विचार करून त्यांनीआपापले निष्कर्ष काढले व दूरगामी उपायांची योजना केली.

**संवैधानिक मार्गांचा अवलंब**

भाषणात यापूर्वी मी जी उदाहरणे दिली आहेत त्यावरून कोणत्या पद्धतीने पू. बाबासाहेबांचे मन काम करून राहिले होते, हे आपल्याला दिसेल. एका विशिष्ट परिस्थितिमध्ये समतेचा उद्घोष त्यांनी केला ही गोष्ट जितकी खरी आहे तितकीच, मी सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे, अत्यंत उत्तेजक, प्रोव्होकेटिव्ह अशा परिस्थितिमध्ये सुद्धा, ज्या वेळी त्यांच्यावर काही शारीरिक हल्ले झाले होते अशा परिस्थितीतसुद्धा, आणि या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी त्यांचे अनुयायी तयार होते आणि त्यामुळे मोठे दंगे होऊ शकले असते अशा परिस्थितीतसुद्धा, सर्वांना बरोबर आवरून, शांतता कायम ठेवून केवळ संवैधानिक मार्गांनी त्यांनी आपल्या चळवळी केलेल्या आहेत. ह्या ज्या सर्व गोष्टी आहेत यांमध्ये त्यांच्या मनासमोर शेवटचे जे चित्र होते ते आपल्या एकीकृत अशा भारताचे होते, ज्यामध्ये जयचंद निर्माण होऊ नयेत असे त्यांनी म्हटले आहे; ज्यामध्ये दाहीर राजाचे मुनीम निर्माण होऊ नयेत असे त्यांनी म्हटले आहे. अशा प्रकारे शंभर टक्के देशभक्तीचे अंतिम चित्र त्यांच्या मनासमोर होते. आणि त्यांनी सवर्ण मंडळींना समजावूनही सांगण्याचा पुष्कळसा प्रयत्नकेला. परंतु त्यांच्या समजावण्यामुळे ही मंडळी समजण्याची शक्यता नव्हती. आणि त्यामुळे त्यांनी शेवटी काही मार्ग घ्यावे लागले; पण ते मार्गसुद्धा धर्माच्या आधारावर आणि संवैधानिक असेच त्यांनी घेतले. हा जो त्यांचा संयम, हा बॅलन्स, जर ध्यानात घेतला तर त्यांच्या मनासमोर काय चित्र होते ते आपल्याला कळू शकेल.

त्याचबरोबर अशा प्रकारच्या परिस्थिमधून जर मार्ग काढायचा असेल तर तात्पुरती मलमपट्टी म्हणून काही पोलिटिकल सोल्यूशन्स द्यावे लागले तरी, खरी बिमारी काय आहे याविषयी पू. बाबासाहेबांचेही निदान पाहणे आवश्यक आहे. त्यांनी स्पष्ट ही भूमिका घेतली आहे की, आम्हांला या ठिकाणी क्लासस्ट्रगल, क्लास-वॉर या गोष्टी उत्पन्न होऊ द्यायच्या नाहीत. संपूर्ण समाजात एकताही उत्पन्न व्हायला पाहिजे. अशा प्रकारची एकता जर निर्माण झाली तर बाकीच्या गोष्टी ठीक राहू शकतील अशा भावना त्यांनी वारंवार प्रकट केल्या आहेत.

आनंदाची गोष्ट ही आहे की, एका विशिष्ट भूमिकेवर असल्यामुळेत्यांनी सत्याच्या एकाच पैलूवर भर दिलेला आहे. (सत्य एक, पैलू अनेक आणि निरनिराळ्या लोकांनी निरनिराळ्या पैलूंवर भर दिलेला आहे.) भर एकाच पैलूवर की देशामध्ये क्लासच्या नावाखाली विघटन नको आणि जातींच्या नावाखाली सुद्धा विघटन नको. पण आज ही गोष्ट ऐकण्याकरता उच्चवर्णीय तयार नाहीत. म्हणून संवैधानिक संघर्ष सरकार आणि उच्चवर्णीयांविरुद्ध संघटित

करण्याचेकाम बाबासाहेबांना करावे लागले, हा एक पैलू प्रकर्षाने त्यांच्या जीवनामध्ये आहे.

## पू. डॉक्टरांचा पॉझिटिव्ह ॲप्रोच

सत्याच्या दुसऱ्या एका पैलूवर अधिक भर देऊन दुसऱ्या एका श्रेष्ठ पुरुषाने, पू. डॉ. हेडगेवारांनी काम केले होते आणि निराळ्यादृष्टीने हाच प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला होता. जातीभेद असोत, वर्गकल्पना असो, त्यातून निर्माण होणारे संघर्ष असोत, या सर्व गोष्टींविषयी प.पू. डॉक्टरांची कल्पना ही होती की, हे नको हे खरे आहे; एलिमिनेट करण्याकरता मार्ग काय? एक मार्ग तर असा असू शकेल की, हे सांगणे, की हे वाईट आहे. हे सोडा. पण मनोविज्ञानावर आधारलेले त्यांचे मत असे होते की, निगेटिव्ह ॲप्रोच पुष्कळदा काउंटर प्रॉडक्टिव्ह असा होतो. 'भेद विसरा' हे म्हणणारा एक ॲप्रोच आणि आम्ही सर्व एक आहोत हा दुसरा ॲप्रोच. गोष्ट एकच. एम्फसिसमध्ये फरक, मांडण्याच्या पद्धतीत फरक. भेद आहेत. हे भेद सर्वांनी विसरायला पाहिजेत, हा एक ॲप्रोच आणि आम्ही सर्व एकच आहोत, जरी वरवर भेद दिसले तरी. हा दुसरा ॲप्रोच. ॲप्रोचमध्ये बदल झाल्यामुळे, शब्दरचनेमध्ये बदल झाल्यामुळे, सायकॉलॉजिकल फरकहोतो. अशा प्रकारचे एक उदाहरण त्या वेळेला देण्यात आले होते.एका गावामध्ये एक जादूगार गेला आणि त्याने अशी जाहिरात केली की, ''माझ्याकडे एक अशी जादूची कांडी आहे की जी कांडी मंत्रोच्चारासहित पाण्याच्या परातीत फिरवली तर त्या परातीतील संपूर्ण पाण्याचे सोने होईल.'' आणि फी म्हणजे शुल्क त्याने फार थोडे ठेवले होते. तेव्हा नुसत्या जादूच्या कांडीने एवढे मोठे पाणी, त्याचे जर सोने होणार असेल तर शुल्क देऊन कोण येणार नाही? अनेक लोक त्याच्याकडे जायचे. तो एक कर्मकांड सांगायचा की, ''स्नान कर, इथं बस, तिथं बस, डोळे मीट. जादूची कांडी हातात घे, हा मंत्र म्हण—मन स्थिर करून म्हण. पण हे सगळे सांगत असताना तो शेवटी सांगायचा, की पाहा. आता सांगितले ते सगळे केले तर पाण्याचे सोने होईल, फक्त एका गोष्टीची काळजी घ्यायची. काय—तर म्हणे चुकून असे होऊ नये की, तुला त्या वेळी माकडाचे स्मरण व्हावे. जर हे सर्व करत असताना सुद्धा माकडाचे स्मरण झाले तर हा मंत्र प्रभावी होणार नाही.'' मंत्र म्हणताना 'माकडाचे स्मरण होऊ नये'. हे सांगण्यात आल्यामुळे, जो जो मनुष्य शुल्क देऊन ती जादूची कांडी घेऊन येत असे, तो पुन्हा स्नान करून आसनावर बसला व मंत्र म्हणू लागला की, त्याला 'माकडाचे स्मरण होऊ नये', ही अट आठवायची. म्हणजे त्याला माकडहटकून आठवायचेच. आणि माकड आठवले की त्याला वाटायचे, 'काय करावे? हा मंत्र तर प्रभावी आहे. पण मीच असा अभागी आहे की मला माकडाचे स्मरण होत आहे.' तेव्हा चांगलाही उपदेश जर निगेटिव्ह पद्धतीने केला गेला, 'अमुक करू नका,' असे जर म्हटले गेले तर 'करू नका' असे जे म्हणण्यात येते तीच गोष्ट अधिक लक्षात रहाते. त्या पद्धतीने 'भेद नकोत' हे म्हणणे एक; परंतु 'आम्ही सर्व एक

आहोत' असा एक पॉझिटिव्ह ॲप्रोच, हा एक ॲप्रोच घेऊनएक नवीन प्रयोग काही गाजावाजा न करता पू.डॉ. हेडगेवारांनी सुरू केला. यामध्ये 'जातीभेद मोडा,' 'जाती मोडा' हा प्रोपोगान्डा केलेला नाही. पण असे म्हटले आहे की जातीच नाहीत. आम्ही म्हटले, 'आम्ही सर्व हिंदू आहोत, आम्ही अस्पृश्यता रेकग्नाईज करत नाही. कुठे आहे अस्पृश्यता? सर्व हिंदू आहेत.' अशा प्रकारचा एक ॲप्रोच घेऊन डॉक्टरांनी कामाला सुरुवात केली. तो ॲप्रोच बरा आहे का वाईट आहे हे काळाच्या कसोटीवर ठरेल; पण असा एक अभिनव प्रयोग डॉक्टरांनी सुरू केला होता. पू. डॉक्टरांचा हा ॲप्रोच भगवान बुद्धांच्या पुढील उदगारांची आठवण करून देणारा आहे.

## एम्फसिस्मध्ये केवळ फरक

भिक्षू-संघातील भिक्षूंना उद्देशून भगवान बुद्ध म्हणाले, "हे भिक्खू हो! तुम्ही निरनिराळ्या देशांतून व निरनिराळ्या जातींतून आला आहात, आपापल्या प्रदेशातून नद्या वाहतात तेव्हा त्या पृथक्-पृथक् असतात, मात्र त्या सागरात मिळाल्या की, त्या पृथक् राहात नाहीत; त्या एकजीव व समान होतात. बौद्ध संघ हा सागराप्रमाणे आहे. या संघात सर्व सारखे व समान असतात. डॉक्टरांचा संघही असाच सागरासमान आहे. सामाजिक, राष्ट्रीय प्रश्नांकडे पाहण्याचे अंतिम ध्येय ह्या दृष्टीने दोघांचे लक्ष्य एकच होते. परंतु ज्या परिस्थितीमध्ये हे दोघेही होते, त्या परिस्थिती भिन्नभिन्न होत्या. ज्या ठिकाणी ते दोघे उभे होते, त्या ठिकाणच्या परिस्थिती भिन्न होत्या, आणि एकाच प्रश्नाकडे एकच लक्ष्य ठेवून पाहणारे असले तरी दोघांच्या अेम्फसिस्मध्ये फरक होता. एकाने एका गोष्टीवर अधिक अेम्फसिस् दिला; दुसऱ्याने दुसऱ्या गोष्टीवर अेम्फसिस् दिला, परंतु अंतिम लक्ष्य, धारणा व भावना, दोघांची एकच होती. सन १९३४ मध्ये आमचे, संघाचे, वर्धा जिल्हा हिवाळी शिबिर वर्ध्याला पूज्य महात्माजींच्या आश्रमाजवळ झाले. गांधीजींनी शिबिराला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. मा. आप्पाजी जोशींनी पू. गांधीजींचे स्वागत केले. महात्माजींनी शिबिराची व्यवस्था तपशीलवार पाहिली. नंतर त्यांनी विचारले, "या शिबिरात हरिजन किती आहेत ?" मा. आप्पाजी म्हणाले, "मला माहीत नाही, कारण आम्ही जातवार चौकशी करीत नसतो." गांधीजी म्हणाले, "मला हरिजनांची संख्या सांगा," आप्पाजी म्हणाले, "मी तसे करू शकत नाही, जोपर्यंत आमचा संबंध आहे....... हे सर्व हिंदू आहेत, आणि आमच्याकरिता तेवढे पुरेसे आहे." महात्माजी म्हणाले, "तर मग मी विचारू काय ?" आप्पाजी म्हणाले, "ते तुमच्या मर्जीवर अवलंबून आहे." गांधीजींनी अनेक स्वयंसेवकांना त्यांची जात विचारली. चौकशीअंती त्यांना कळून चुकले की, आमच्या शिबिरात बरेच हरिजन होते. व ते सर्वांबरोबर सर्व कार्यक्रम करीत होते, एकत्र भोजनाचा सुद्धा. दुसरे दिवशी पू. डॉक्टर त्यांना भेटायला गेले, त्या वेळी गांधीजींनी त्यांना विचारले की, "तुमच्या संघात तुम्ही अस्पृश्यता

निवारणाचा प्रचार कोणत्या प्रकारे करता?'' डॉक्टर म्हणाले, ''आम्ही, अस्पृश्यता पाळू नका असा प्रचार करीत नाही, तर आपण सर्व हिंदू एक कुटुंबाप्रमाणे आहोत असे सांगतो व त्यातून आपोआप स्पृश्यास्पृश्य भावना स्वयंसेवकांच्या मनातून निघून जाते.'' वास्तविक सन १९१६ मध्ये अनुशीलन समितीचे एक श्रेष्ठ नेते श्री त्रैलोक्यनाथ चक्रवर्ती यांना पू. डॉक्टर म्हणाले होते, ''जोपर्यंत आपल्या समाजातील माणसे म्हणजेच पर्यायाने आपला समाज बदलत नाही, तोपर्यंत केवळ इंग्रज निघून गेल्याने मोठासा लाभ व्हायचा नाही. समाजाला बदलून टाकण्याचे, समाजातील दोष नाहीसे करण्याचे हे कार्य मी हाती घेणार आहे.'' परंतु हे कार्य करताना त्यांनी हा दुसरा ॲप्रोच घेतला होता.

## रा.स्व. संघाची धारणा

संपूर्ण हिंदू समाज म्हणजे एक कुटुंब अशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची धारणा आहे. मध्यंतरी श्री गुरुजींच्या एका विधानाविषयी हेतुपूर्वक गैरसमज पसरविण्यात आला होता. परंतु विपर्यस्त प्रचाराची धूळ खाली बसल्यानंतर सामान्य जनांना श्रीगुरुजींची भूमिका स्वच्छ दृष्टीने पाहणे शक्य झाले. नंतर (तृतीय) सरसंघचालक पू. बाळासाहेब देवरसांनी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत या विषयावर केलेल्या भाषणाने तर उरलासुरला गैरसमजही पूर्णपणे धुऊन निघालेला आहे. श्रीगुरुजी सांगत असत की, सर्वांच्या हृदयात घर करून बसलेला जो संकुचिततेचा भाव आहे, त्यांतून हा प्रश्न निर्माण झाला आहे. स्पृश्य समजले जाणारांच्या मनातील अस्पृश्यता नाहीशी करणे हे मुख्य काम आहे. नवजागृत अस्पृश्यांच्या मनांत चीड निर्माण होणे हे स्वाभाविकच आहे. परंतु जोपर्यंत स्पृश्यांच्या मनातील अस्पृश्यता नाहीशी होत नाही, तोपर्यंत या समस्येचे संपूर्ण निराकरण होणार नाही. नवजागृतांच्या मनांतील बंडखोरीची भावना समजण्यासारखी आहे, त्यांतून त्यांच्या प्रगतीचा मार्गही काही प्रमाणात प्रशस्त होऊ शकेल; परंतु प्रश्नाची खरी व परिणामकारक उकल मात्र भावात्मक (पॉझिटिव्ह) कौटुंबिक भावनेतूनच होऊ शकेल. श्रीगुरुजी म्हणत की, ''आज कोणताही वर्ण अस्तित्वात नाही, कोणतीही जाती अस्तित्वात नाही. आम्हा सर्वांचा एकच वर्ण, एकच जाती आहे, तो वर्ण, ती जाती म्हणजे हिंदू.''

हे खरे आहे की, काही अन्य समाज-सुधारकांप्रमाणे समाजाला सुधारण्याचा उपदेश करण्याच्या प्रयत्नाचे नेतृत्व पू. डॉक्टरांनी किंवा श्री गुरुजींनी आपल्या स्वभावानुसार स्वतःकडे घेतले नाही. धर्माचार्यांनी ते नेतृत्व स्वीकारावे, असा दोघांचाही आग्रह होता. पू. श्री गुरुजींनी १९६६ साली याच उद्देशाने परस्परांची भेटही न घेणाऱ्या धर्माचार्यांना एका मंचावर एकत्र आणण्याचे कार्य विश्व हिंदू परिषदेच्या संमेलनात केले. पू. बाबासाहेब आंबेडकरही म्हणत असत की, समजा एखाद्या सामाजिक वा धार्मिक प्रश्नाबद्दल तुमच्या

गोळवलकरांनी एक निर्णय दिला व त्याच विषयासंबंधी शंकराचार्यांनी त्याहून भिन्न निर्णय दिला तर या स्थितीत सामान्य सनातनी सवर्ण हिंदू कुणाचा निर्णय शिरोधार्य मानतील ? अर्थात् शंकराचार्यांचाच. शंकराचार्यांना मानतो कोण ? हू इज धिस शंकराचार्य ? असे म्हणणाऱ्या या पुरोगामी मंडळींना शांतपणे पू. श्रीगुरुजी सांगत, "अहो, शंकराचार्यांना तुम्ही किंवा मी मानतो की मानीत नाही हा खरा प्रश्ननाही.ज्या स्पृश्यांना आपण अस्पृश्यता न पाळण्याविषयी सांगत आहोत ते कुणाला मानतात हा खरा प्रश्न आहे. ते तुम्हालाही मानीत नाहीत व मलाही मानीत नाहीत. ते धर्माचार्यांचा शब्द प्रमाण मानतात. तुमचा आमचा शब्द प्रमाण मानीत नाहीत. त्यांचे हृदयपरिवर्तन करावयाचे असेल तर धर्माचार्यांकडून त्यांना तसे आदेश देवविणे, हेच परिणामकारक होईल." या दृष्टीने विश्व हिंदू परिषदेने केलेले कार्य, त्यात सुधारकी खळखळाट नसला तरी, किंबहुना तसा खळखळाट नसल्यामुळे, अधिक मूलगामी झाले आहे. हे बौद्धिक प्रामाणिकता बाळगणाऱ्या कोणाही निष्पक्ष व्यक्तीला मान्यच करावे लागेल. अशा प्रकारे हेडगेवारांविषयी तर आपल्याला पूर्ण कल्पना आहेच. डॉक्टर आंबेडकरांच्या मनामध्ये कोणत्या प्रकारे हीच भावना होती हे मी त्यांच्या काही उदाहरणांवरून सांगितले आहे. आता भारत स्वतंत्र झाला आहे. तेव्हा पुन्हा आपण आपसांतल्या भेदांमुळे—आणि आधी जे जाती वगैरेमुळे भेद होते त्यांत आता राजकीय पक्षांचे भेद ही एक भर पडली त्यामुळे—मला चिंता वाटते, तेव्हा आपण आपली राष्ट्रीय एकता कायम टिकविलीच पाहिजे, हे जे पू. बाबासाहेबांनी आपल्या अंतिम समारोपाच्या भाषणात म्हटले, ही जी त्यांच्या हृदयामधील तळमळ आहे, या दोन्ही गोष्टींचा आपण विचार जर केला, तर भावना एक, लक्ष्य एक, पण एम्फसिस्‌मध्ये काही फरक, अशा प्रकारे या दोन श्रेष्ठ महापुरुषांचे कार्य होते. सामाजिक समरसतेशिवाय समता राहू शकत नाही. पू. बाबासाहेबांनाही याची जाणीव होती. दि. २५-११-१९४७ रोजी दिल्लीला बोलताना त्यांनी हे स्पष्ट केले. ते म्हणाले, "आपण बंधुभावाचे तत्त्व आचरणात पाळीत नाही, ही आपणामधील दुसरी उणीव होय. आपण भारतीय लोक हे परस्परांचे सख्खे भाऊ होत, सर्व भारतीय जनता ही एका जिव्हाळ्याची एकच एक जनता होय, अशी जी मनात भावना असते, ती 'बंधुभावना' या नावाने ओळखली जाते. सामाजिक जीवना ऐक्याचे अमृतसिंचन जर कोणते तत्त्वकरीत असेल तर ते बंधुभावाचे तत्त्व होय. हे तत्त्व दररोजच्या व्यवहारात यशस्वीरीतीने पाळणे हे मोठे बिकट कार्य आहे. भारतात अनेक जाती अस्तित्वात आहेत. या जाती देशविघातक आहेत. त्याचे पहिले कारण हे की, जाती, सामाजिक जीवनात तुटकपणा उत्पन्न करतात. जाती देशहित-विघातक आहेत ह्याचे दुसरे कारण हे की, त्या जाती-जातींत मत्सर आणि तिरस्कार निर्माणकरतात. 'राष्ट्र' या पदाला प्राप्त होण्याची आपणाला खरोखर इच्छा असेल तरआपण ह्या सर्व अडचणींना आपल्या मार्गातून दूर केले पाहिजे. कारण जेथे

राष्ट्र अस्तित्वात असते तेथेच बंधुभाव उत्पन्न होऊ शकतो. बंधुभाव अस्तित्वात नसेल तर समता, स्वातंत्र्य यांच्या अस्तित्वाला काय अर्थ राहणार ?'' हिंदू समाजाची अंगभूत एकात्मकता व सामाजिक विकृतीमुळे तीस गेलेला तडा यांची पूर्ण जाणीव पू. बाबासाहेबांना होती. त्यामुळे त्यांचे हृदय अतिशय व्यथित होत असे. ही सामाजिक समरसता पुनः संस्थापित व्हावी, अशी त्यांची तीव्र इच्छा होती. सामाजिक समरसतेची व्याख्या व वर्णन बाबासाहेबांच्या पुढील उद्धरणांत आढळते.

''For commonness, to share and participate in common activity so that the same emotions are aroused in him that animate the others making the individual a sharer or party in the associated activities, so that he feels its success as his success, its failure as his failure, is the real thing that binds man, and makes a society out of them. The caste system prevents common activity and by preventing common activity it has prevented the Hindus from becoming a society, with a unified life and conciousness of its own being!''

[''सामाजिक समरसतेसाठी सर्वांनी एखाद्या कार्यात सहभागी होणे आवश्यक असते. कारण इतरांना कार्यप्रवृत्त करणाऱ्या ज्या भावना असतातत्यांचे स्पंदन मग एकेका व्यक्तीच्या ठायी होत असते. त्या कार्यात मी सहभागी आहे असे त्याला वाटू लागते. कार्याचे यश हे माझे यश आहे, आणि अपयश हे माझे अपयश आहे असा अनुभव तो घेऊ लागतो. माणसाला इतरांशी बांधून ठेवणारी हीच महत्त्वाची गोष्ट आहे. यांतूनच समाज उभा होतो. जातिव्यवस्थेमुळे समान कार्यात सर्वांनी सहभागी होण्याच्या मार्गात अडसर निर्माण झाला आणि त्यामुळे एकात्म जीवन व आपल्या अस्मितेची जाण घेऊन हिंदू लोक समाज या नात्याने उभे राहिलेच नाहीत.'']

पू. बाबासाहेबांच्या मनातील हिंदू समाजाविषयीची ही तळमळ पू. डॉ. हेडगेवार यांच्या तळमळीहून भिन्न होती, असे म्हणणे बौद्धिक अप्रामाणिकतेचे लक्षण मानावे लागेल.

**समरसतेमुळे समता**

पूर्वी सांगितल्याप्रमाणे दिनांक १४ एप्रिल १९८३ रोजी जी या मंचाची स्थापना झाली, तो पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा इंग्लिश कॅलेंडरप्रमाणे जन्मदिवस होता आणि पूज्य डॉक्टरांचा हिंदू कॅलेंडरप्रमाणे जन्मदिवस होता. पूज्य डॉक्टरांची विशेषता समरसता, पू. बाबासाहेबांची विशेषता समता, ही दोघांनाही पाहिजेच आहे. पण समता ही समरसतेशिवाय राहू शकत नाही. मनुष्याची ही सायकॉलॉजी आहे, त्यामध्ये जर संपूर्ण समाजाविषयी समरसता नसेल तर समरसतेच्या अभावी विषमता निर्माण होणे हे अपरिहार्य आहे. संपूर्ण समाजाविषयी समरसता नसेल तर बुद्धिमान लोकांनी निर्बुद्धांचे, बलवान लोकांनी

निर्बलांचे, धनिक लोकांनी निर्धनांचे शोषण का करू नये, याला काही समर्थन-जस्टिफिकेशन नाही. तेव्हा इतरांचे शोषणकरण्याची माझी क्षमता असताना सुद्धा मी शोषण न करता, माझ्या कर्तृत्वाचा उपयोग इतरांच्या हिताकरता करतो आहे, हे केवळ समरसतेमुळेच उत्पन्न होऊ शकते. तेव्हा खरी हमी, खरी गॅरेंटी, जर कोणती असेल तर समरसता; कौटुंबिक भावना; संपूर्ण समाज एक कुटुंब आहे ही भावना. अशा प्रकारे संपूर्ण समाजाविषयी समरसता असेल तर त्यातून मग समता ही स्वाभाविकपणे उत्पन्न होऊ शकते. तेव्हा विषमता सोडून समता व्हायला पाहिजे ही गोष्ट खरीच आहे. परंतु समता हे अंतिम टर्मिनस् असू शकत नाही. हे एक मधले स्टेशन आहे. जर शेवटचे टर्मिनस् समरसता नसेल, समतेपाशीच जर आमची गाडी थांबली तर समता टिकणे हे अशक्यच आहे. पूज्य बाबासाहेबांच्या पुढील विधानातून हाच भाव प्रकट होत आहे.

## समरसता म्हणजे बंधुभावना

"माझ्या तत्त्वज्ञानाची मुळे धर्मात आहेत. राज्यशास्त्रात नाहीत. माझे गुरू बुद्ध यांच्या शिकवणीपासून ते मी काढले आहे. माझ्या तत्त्वज्ञानात स्वातंत्र्य आणि समता यांना जागा आहे. परंतु अपरिमित स्वतंत्रतेने समतेचा नाश होतो आणि निर्भेळ समानता स्वातंत्र्याला वाव ठेवीत नाही. माझ्या तत्त्वज्ञानात स्वातंत्र्य आणि समता यांचे उल्लंघन होऊ नये म्हणून, केवळ संरक्षण म्हणून निर्बंधाला स्थान आहे. परंतु निर्बंध हास्वातंत्र्य नि समता यासंबंधी होणाऱ्या उल्लंघनाविरुद्ध हमी देऊ शकतो असा माझा विश्वास नाही. माझ्या तत्त्वज्ञानात बंधुतेस फार उच्च स्थान आहे. स्वातंत्र्य नि समता यांच्या विरुद्ध संरक्षण फक्त बंधुभावनेचेच आहे. याचेचदुसरे नाव बंधुता किंवा मानवता आणि मानवता हेच धर्माचे दुसरे नाव आहे." ही बंधुता, बंधुभावना याचेच दुसरे नाव सामाजिक समरसता आहे. ही मानवता आहे, हाच धर्म आहे. भगवान बुद्धांची मैत्री व करुणा यांतून समरसतेचाच परिपोष होतो. तिचे पोटी समता विकसित होते. जे प्रोग्रेसिव्ह, लिबरल, रॅडिकल, रेव्होल्युशनरी वगैरे लोक समता हे अंतिम गंतव्यस्थान आहे असे म्हणतात, त्यांना मी आव्हान देऊन सांगतो की, जगाच्या इतिहासातअसे एक उदाहरण दाखवा की, केवळ समतेवर आग्रह धरून समता स्थापन झालेली आहे. प्रत्येक क्रांतीच्या वेळी हा अनुभव आलेला आहे, की जी माणसे ऑप्रेस्ड होती, जे शोषित होते त्यांनी बंड केले, शोषकांच्या विरुद्ध बंड केले हे बरोबर आहे. पण एक श्रेष्ठ विश्लेषक श्री. फ्रायर याने असे म्हटले आहे की, 'जेव्हा जेव्हा शोषित शोषकांविरुद्ध बंड करतात, त्यावेळेला क्रांतीचे नेतृत्व करणाऱ्या पुढाऱ्यांमध्ये दोन प्रकारचे पुढारी असतात.' दोन प्रकारचे पुढारी कसे? तर त्यांनी असे म्हटलेले आहे की, शोषकांविरुद्धची चीड ही तर सामान्य गोष्ट आहे. पण ही शोषकांविरुद्धची चीड असणारे दोन प्रकारचे लोक

आहेत. ज्यांना हे शोषक नकोत हे तर वाटते, पण शोषण करणाऱ्या लोकांची जी जीवनमूल्ये आहेत तीच या शोषितांच्या पुढाऱ्यांची आहेत. शोषकांच्या ज्या जीवननिष्ठा आहेत त्याच यांच्याही आहेत. हे शोषक नकोत, त्यांना हाणून पाडायला पाहिजे. त्या ठिकाणी आम्ही यायला पाहिजे ही तर भावना आहे. पण जीवननिष्ठा आणि जीवनमूल्ये तर शोषकांचीच आहेत. तेव्हा त्याने असे म्हटले की क्रांती होते. ही क्रांती यशस्वीही होऊ शकते, त्यातून शोषकवर्गाचा बीमोडही होऊ शकतो. शोषितांचे पुढारी सत्तेवरही येऊ शकतात. पण त्यांची जीवनमूल्ये तीच आहेत जी शोषकवर्गाची आहेत. तेव्हा हे नवीन पुढारी सत्तेवर आल्यानंतर वुइथ डबल व्हेंजन्स त्याच प्रकारचा व्यवहार चालू ठेवतात जो व्यवहार पूर्वीच्या शोषकांनी चालू ठेवलेला होता. त्यामुळे जनतेची स्थिती "ट्विडल् डम अँड ट्विडल् डी" "जैसे सोमनाथ वैसे नागनाथ" अशी होते. "ट्विडल् डम अँड ट्विडल् डी" जनता पुन्हा शोषणाला बळी पडते. शोषण करणारांचे चेहरे बदलतात. पण शोषणाची प्रक्रिया ही सारखीच चालू असते. कारण जीवनमूल्ये तीचअसतात.

## माओचा सिद्धांत

पण दुसरा एक मार्ग असा असू शकतो की, ज्यांची जीवनमूल्ये निराळी आहेत. शोषकांना हटवायचे आहे. क्रांती घडवून आणायची आहे. पण ही जी क्रांती घडवून आणायची आहे ती निराळ्या जीवनमूल्यांकरता आहे. म्हणून यांच्या हाती सत्ता आल्यामुळे हे लोक केवळ सत्तेच्या हपापामुळे वाहून न जाता नवीन पद्धतीने समाजाची रचना करतील, असा एक वर्ग असू शकतो. पण फ्रायरने असे म्हटले आहे,—की, "आतापर्यंत झालेल्या निरनिराळ्या क्रांत्यांमध्ये हाच अनुभव आलेला आहे की, शोषकांपेक्षा निराळी जीवनमूल्ये, निराळ्या जीवननिष्ठा जोपासना करणारे अशा प्रकारचे क्रांतिकारकांचे पुढारी फार फार अपवादात्मक असतात. शोषकांच्याच जीवननिष्ठांची जोपासना करणारे पुढारी असतात आणि त्यामुळे क्रांती होऊन एक शोषकवर्ग जरी हटला तरी पुन्हा शोषणाची प्रक्रिया नवीन नेतृत्वाच्या खाली सुरू होते आणि पुन्हा. एकदा क्रांतीची आवश्यकता निर्माण होते. हीच गोष्ट माओत्सेतुंगसारख्यानेही म्हटलेली आहे. त्याने असे म्हटले की, "१९४९ मध्ये आमच्या इथे आम्ही क्रांती घडवून आणली. क्रांतिकारक लोकांच्या हाती आम्ही शासनयंत्रणा दिली, पण शासनयंत्रणा दिल्यानंतर आमच्या असे लक्षात आले की, यस्टरडेज रिव्हॉल्युशनरीज बिकेम टुडेज कौंटर रिव्हाल्युशनरीज." कालचे क्रांतिकारी आजचे प्रतिक्रांतिकारी झालेले आहेत. त्यांना हटवण्याकरता पुन्हा सांस्कृतिक क्रांति करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. असे जस्टिफिकेशन त्याने सांस्कृतिक क्रांतीचा सूत्रपात करताना दिले होते. पण तो प्रामाणिक असल्यामुळे, त्याने आणखी हे म्हटले, पुन्हा एकदा क्रांती करून आणि जुने

क्रांतिकारक नेतृत्व पुन्हा एकदा बदलूनच हे काम होणार नाही; तर हे जे नवीन पुढारी पुन्हा शासनामध्ये येतील, हे नवीन पुढारीसुद्धा पुन्हा प्रतिक्रांतिकारी बनतील, त्यांनाही हटवण्याकरता पुन्हा क्रांती करावी लागेल. म्हणजे १०-१५ वर्षांनंतर वारंवार क्रांतीची आवश्यकता निर्माण होईल. 'थिअरी ऑफ परपेच्युअल रिव्होल्यूशन'—अखंड क्रांतीचा सिद्धांत माओत्सेतुंगने प्रतिपादन केला होता तो सर्वांनी ऐकलेला आहे.

### समस्या सुटेल केव्हा ?

तेव्हा ज्या ज्या वेळी अशाप्रकारे शोषक विरुद्ध शोषित नवजागृत समाजाचे बंड किंवा विद्रोह, प्रतिक्रिया किंवा प्रतिकार निर्माण होतो, त्या वेळेला ही एक गोष्ट ध्यानात ठेवण्यासारखी असते की याच्यामध्ये केवळ मनातला आवेश, मनातली चीड ही अनियंत्रित असल्यामुळे काहीतरी तोडफोड, सूड घेण्याची भावना, या सर्व गोष्टी सामान्य लोकांच्या, शोषितांच्या मनामध्ये येऊ शकतात. त्यातून सर्व समाजाला बरोबर घेऊन जाणारा कोणताही एक नवा मार्ग येऊ शकत नाही. दलितांचे सुद्धा त्यामधून कल्याण होऊ शकत नाही. कारण क्रांतीचे नेतृत्व करणारे जे दलित पुढारी असतील ते स्वतः यशःप्राप्तीनंतर शोषक बनतात. हा प्रत्येक क्रांतीचा अनुभव आहे.* नाव घेण्याची आवश्यकता नाही.

---

*बंडखोर शोषितांची जीवनमूल्ये शोषक राज्यकर्त्यांच्या जीवनमूल्यांसारखीच असली तर शोषितांचा विजय झाल्यानंतर ते दुप्पट उत्साहाने इतरांचे शोषण करण्याचे धोरण सुरू करतात हे फ्रायरचे विधान सिद्ध करणाऱ्या अनेक घटना इतिहासात आहेत त्यांपैकी एक महत्वाची घटना निग्रो जातीशी संबंधित आहे.

ब्रिटिश ग्वायनामध्ये निग्रोंची जनसंख्या ३३ टक्के व भारतीयांची ५२ टक्के आहे. इंग्रजांचे साम्राज्य येथे असताना निग्रो जमातीवर गोरे लोक अत्याचार करीत. त्यामुळे निग्रोंच्या मनांत गोऱ्यांच्याविषयी विद्वेष व इतरांच्या मनांत निग्रोंच्याविषयी सहानुभूती अशी स्थिती होती.

दुसऱ्या महायुद्धानंतर इतर देशांप्रमाणे ब्रिटिश ग्वायनामध्येही सत्तेचे हस्तांतर झाले. सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळाल्यामुळे भारतीयांना स्वराज्यात चांगले दिवस येण्याची आशा वाटू लागली. परंतु त्याच वेळी त्या क्षेत्रांतील आंतरराष्ट्रीय संतांनी म्हणजे युनायटेड स्टेट्स्, इंग्लंड, फ्रान्स व हॉलंड, यांनी कॉरिबियन कमिशन स्थापन केले व नवस्वतंत्र ग्वायना भारतीयांच्याविरुद्ध निग्रोंना वंशवादाच्या आधारावर भडकविण्याचा प्रयत्न सुरू केला. निग्रोंची संख्या कमी होती. स्वाभाविक रीतीने भारतीयांचेच शासन यावयाचे. त्यामुळे निवडणुकींची नवीन पद्धती शोधून अल्पसंख्य जमातीला सत्तेत आणण्यात आले. या पद्धतीचे नाव आहे. Voting by Proxy. [अनुपस्थितांनी प्रतिनिधित्व केलेले मतदान]

(पुढील पानावर)

एकदा ज्यांनी प्रतिष्ठित वर्ग आणि वर्ण यांच्या विरुद्ध बंड केले होते, बंडाचे नेतृत्व ज्यांनी केले तेच आता प्रतिष्ठित झाल्यामुळे बाकीचे लोक त्यांच्याविरुद्ध बंड करायला उभे राहात आहेत, असे हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांमध्ये आपण पाहतो आहोत. तेव्हा बंड करणे हे स्वाभाविक असले तरी त्यातून समस्येचे निराकरण होऊ शकत नाही. समस्येचे निराकरण खरोखर व्हायचे असेल तर दोन्ही प्रकारची

अप्रियता पत्कारावी लागेल, अशा प्रकारचे निहित स्वार्थवाले, व्हेस्टेड इंटरेस्टवाले, ज्यांच्या हातचे अधिकार नवीन क्रांतीमुळे जाणार आहेत अशा सर्वांची नाराजी पत्करून, पण जे शोषित असल्यामुळे, आवेगामुळे, आदेशामुळे एक्स्ट्रीमिस्ट बनू इच्छितात, त्या लोकांचीही नाराजी पत्करून संवैधानिक मार्गाने, संतुलित पद्धतीने शोषितांचे नेतृत्व

---

(मागील पानावरुन) |

या पद्धतीच्या अंतर्गत विदेशांत राहणाऱ्या ग्वायनाच्या लोकांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. या पद्धतीमुळे चलाखी करून बहुसंख्याकांना अल्पसंख्य बनविण्यात आले. यांत मुख्यतः डॉक्टर छेदी जगन यांना पसंत न करणाऱ्या अमेरिकन सरकारचा दबाव मुख्यतः कारणीभूत झाला.

विदेशी संतांच्या मदतीने एकदा सरकार बनविल्यानंतर निग्रोंनी आपली वृत्ती एकदम बदलली. गोऱ्यांच्या विरुद्ध असलेला द्वेष आता भारतीयांच्या विरुद्ध प्रखर झाला. गोऱ्यांची व निग्रोंची युती झाली. दि. २५ मे १९६४ रोजी घडवून आणलेल्या 'Wismar' 'विस्मार' हत्याकांडाची पुनरावृत्ती ठिकठिकाणी होऊ लागली.

नॅशनल सर्व्हिस स्कीमसारख्या योजना मुद्दाम सुरू करण्यात आल्या. व त्या माध्यमांतून भारतीय महिलांना असहाय बनवून निग्रो त्यांचेवर बलात्कार करू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली. निग्रोंच्या वासनापूर्तीकरता भारतीय युवतींचा उपयोग करण्यात येऊ लागला. नोकऱ्यांमध्ये व सार्वजनिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांत अल्पसंख्य निग्रो बहुसंख्य भारतीयांचा उघडउघड छळ करू लागले.

जो इतिहास ब्रिटिश ग्वायनाचा आहे तो व तसाच त्रिनिदाद व सूसिनामचाही आहे. एके काळी गोऱ्यांच्या अत्याचाराला बळी पडलेले निग्रो सी.आय्.ए. च्या कारस्थानामुळे आता भारतीयांच्या विरुद्धच उठले आहेत व त्यांचेवर अत्याचार करू लागले आहेत.

शोषित समाज विद्रोह करून उठतो आहे येवढे पुरेसे नाही. त्यांची जीवनमूल्येही शोषकांच्या जीवनमूल्यांहून भिन्न असली पाहिजेत. तसे नसेल तर विजयी झालेला शोषित समाज स्वतःच शोषकाची भूमिका दुप्पट आवेशाने पार पाडतो. याचे उत्तम उदाहरण ग्वायना, त्रिनिदाद व सूसिनाम या देशांतील निग्रोंचे आहे.

करण्याची आवश्यकता आहे. आणि हे करताना शोषक असो, शोषित असो, आपण सर्व एकाच समाजाचे अंग आहोत आणि ज्याप्रमाणे संपूर्ण कुटुंब मिळून एक युनिट असते, कुटुंबामध्ये जे दूध पिणारे लहान मूल आहे, ६० वर्षांचा म्हातारा-जो खाटेवर पडलेला आहे, जो लंगडा आहे, पांगळा आहे, अशा प्रकारच्या लोकांची जास्त काळजी घेण्यात येते, त्याप्रमाणे संपूर्ण समाज हे एक कुटुंब असल्यामुळे या कुटुंबामध्ये सामाजिक व आर्थिक दृष्टीने जे कमजोर लोक आहेत त्यांची काळजी घेण्याची स्वाभाविक प्रवृत्ती व्हावी. या दृष्टीने सामाजिक समरसता हाच खरा स्थायी तोडगा, स्थायी उपाय या परिस्थितीवर असू शकतो. सामाजिक समरसता जर निर्माण होणार नाही, तर केवळ प्रतिक्रियेमधून शेवटी अखंड क्रांतीच्या सिद्धांताकडे पोहचावे लागेल. हा खरा मार्ग होऊ शकणार नाही. याच जाणीवेतून महात्मा फुले यांनी काढलेले पुढील उद्‌गार मननीय आहेत. ''यावरून या बलिस्थानांतील एकंदर शुद्रातिशूद्रांसह भिल्ल, कोळी वगैरे सर्व लोक विद्वान् होऊन विचार करण्यालायक होईतो ते **सर्व सारखे एकमय लोक झाल्याशिवाय 'नेशन' होऊ शकत नाही.''**

हे वेगळे सांगण्याची गरज नसावी की, यातील 'एकमय' तेलाच आम्ही सामाजिक समरसता असे संबोधिले आहे.

हिंदू समाजातील अस्पृश्य-सवर्ण ही विभागणी अमेरिकेतील काळ्या-गोऱ्यांच्या किंवा प्राचीन ग्रीसमधील गुलाम-नागरिकांच्या विभागणीशी समकक्ष-समतुल्य नाही. ऐतिहासिक कालातील घटनाक्रम दुर्भाग्यपूर्ण खराच, परंतु हेही सत्य आहे की, हे सर्व एकाच राष्ट्राचे अभिन्न अवयव आहेत. परंतु ज्योतिबांच्या पुढील विधानातील विदारक सत्य सर्वांनाच विचारप्रवर्तक वाटेल. ते म्हणतात, ''भारतात जो भिन्न समाज आहे. जेथे एकमेकांच्या बरोबर राहण्याचा संकल्प नाही तेथे राष्ट्रीयत्व कसचे?'' यातून राष्ट्रवादी व राष्ट्रनिर्मात्या मंडळींवरील सामाजिक जबाबदारीचा स्पष्ट बोध होतो. 'भिन्न समाज-' नष्ट करून एकमेकांच्या बरोबर राहण्याचा संकल्प सर्वांच्या मनात दृढ करणे याचेच नाव सामाजिक समरसता आहे व तिच्याच बळावर आतापर्यंतची सामाजिक विषमता दूर करून खरे विशुद्ध राष्ट्रीयत्व जागृत करणे शक्य होईल.

## संपर्काद्वारे परिवर्तन

समतेचा आग्रह धरूनही समतेलाही स्थिर राहण्याकरता समतेची गॅरेंटी जर खरी कशात असेल तर ती सामाजिक समरसतेमध्ये आहे, अशा प्रकारच्या मान्यतेतून या आर्टिकल ऑफ फेथमधून 'सामाजिक समरसता मंच' हा एक मंच गेल्या वर्षी निर्माण करण्यात आलेला आहे. या वेळेला पहिला वर्धापनदिन म्हणून ही आपली सभा होते आहे. हा सामाजिक समरसता मंच कोणतेही महान् कार्य करण्याकरता निर्माण झालेला नाही. कारण

जेव्हा जेव्हा कोणी महान् कार्याची घोषणा करतो त्या त्या वेळेला आमच्या मनामध्ये जरा शंका निर्माण होते. परंतु हळूहळू, शांतपणाने, आपल्या पद्धतीने आपली जी संपर्काची पद्धत आहे या पद्धतीने छोटे कार्यक्रम घेऊन एक नवीन जागृती निर्माण करण्याकरिता थोडा वेळ लागणार आहे. केवळ लोकांच्या भावना भडकावून त्यांचे व्होट्स् प्राप्त करण्याकरता, मग ते अस्पृश्यांचे असोत किंवा सवर्णांचे असोत, तथाकथित उच्चवर्णीयांचे असोत किंवा तथाकथित नीचवर्णीयांचे असोत, हा मंच स्थापन झाला नाही. स्वस्त लोकप्रियतेचा मार्ग एक्स ट्रीमिस्ट बनून शिव्यागाळ करणे हा आहे. आपल्याला काही व्होट्सची आवश्यकता नाही. त्यामुळे शिवीगाळ करण्याचीही आवश्यकता नाही. परंतु जर इलाज व्हायचा असेल तर शांतपणाने, आयुर्वेदिक पद्धतीने केला पाहिजे. तेव्हा फार महान् कार्य आम्ही करणार आहोत अशा प्रकारचा दावा न करता, पण निश्चितपणाने, समाजाच्या जाणीवेतील एक नवीन परिवर्तन, कॉन्शसनेस् मधील परिवर्तन सामाजिक समरसता मंच हळूहळू घडवून आणील अशा प्रकारचा विश्वास आजच्या या पहिल्या वर्धापनदिनाच्या प्रसंगी मी प्रगट करतो आहे.

आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, 'काय बुवा कसे होणार? काय होणार? अशी चिंता करण्याची आवश्यकता नाही. योग्य मार्ग असेल तर आपण आपली गती वाढवण्याबाबत प्रयत्न करावा. हे जे सर्व प्रयत्न आहेत याचा परिणाम होतो. निश्चित रूपाने होतो. थोडा वेळ लागतो पण होतो. उदाहरणार्थ, ज्या लोकांच्या विषयी आतापर्यंतहा समज होता की, त्यांना आपल्या धार्मिक संस्थानांमध्ये व्हेस्टेडइंटरेस्ट आहे, जो सुधारक होऊ शकत नाहीत, अशा लोकांनी सुद्धा परिस्थितीची जाणीव ठेवून जे काही निर्णय घेतलेले आहेत, त्याचा जर आपण विचार केला, [पू. डॉक्टरांचा हा प्रयत्न असो किंवा महामानव बाबांचा हा प्रयत्न असो] तर सगळ्या प्रयत्नांचा क्युमिलिटिव्ह इफेक्ट [संकलित परिणाम] हा निश्चित रूपाने होत असतो असे दिसून येते. ताबडतोब दिसणारा नाही. परंतु हा होत असतो असे हे आपल्या ध्यानात येईल. कशा प्रकारे हा परिणाम होतो, याचे एक लहानसे उदाहरण देतो. गेल्या आठवड्यामध्ये सात-आठ तारखेला विश्व हिंदू परिषदेतर्फे जी धर्मसंसद झाली त्यातील पाचवे सूत्र असे आहे, ''समाजमें श्रमके प्रति प्रतिष्ठाका भाव जागृत कराते हुए उपेक्षित एवं पिछडे हुए बंधुओं को समता एवं एकात्मता की अनुभूती कराना'' या ठिकाणी हे लक्षात ठेवण्यासारखे आहे की, ''समता आणि समरसता' हे दोन्ही शब्द आले आहेत. त्यांनी दुसऱ्या सूत्रांत असे म्हटले आहे की, ''समाज का दुर्बल वर्ग कही भी अस्पर्श एवं घृणा की दृष्टि सेप्रसारित किया जाता है तो उसका पूर्ण परिमार्जन करते हुए सबके बीच सौहार्द पैदा करने की दृष्टिसे पदयात्राके आयोजनसे कृतार्थकरे यह धर्माचार्यों से प्रार्थना।'' आपल्याला केवळ नमुना वाचून दाखवत आहे. जरी काही उतावीळ झालेल्या लोकांना फार निराशा वाटत असली तरी सर्व गोष्टींचे परिणाम होत असतात आणि या दृष्टीने कोणत्याही प्रकारची

घाई-गडबड न करता. 'हेसन स्लोली' (हळूहळू घाई करा) हा पू. गुरुजींचा आपल्याला संदेश होता. या पद्धतीने काम करावयाचे आहे. त्यातून सामाजिक समतेची हमी संपूर्ण समाजाला देणे हा जो एक फार मोठा प्रयत्न आहे या प्रयत्नामध्ये ज्याप्रमाणे गोवर्धन पर्वत उचलताना अनेक गोपालांच्या काठ्या त्याला सहाय्यभूत ठरल्या त्यांपैकी एक काठी म्हणजे हा सामाजिक समरसता मंच आपले काम करील. सर्वांचे सहकार्य त्याला प्राप्त होईल.

**मानववादाचा आधार—समरसता**

सामाजिक समता व सामाजिक समरसता यांच्या अन्योन्य संबंधाविषयी एवढा प्रपंच पुरे. आतापर्यंतच्या आमच्या सर्व प्रतिपादनाचा सारांश असा की, आम्ही सामाजिक समरसतेला शेवटचे गंतव्य स्थान [टर्मिनस] समजतो. त्या दिशेने मार्गक्रमण करीत असताना वाटेत लागणारे एक महत्वाचे स्थानक [स्टेशन] म्हणजे समता. केवळ समता हे अंतिम गंतव्यस्थान होऊ शकत नाही. कारण केवळ समतेच्या प्रतिपादनात समतेच्या स्थापनेचे व ती टिकविण्याचे आश्वासन असू शकत नाही. जगाचा इतिहास त्याचा साक्षीआहे. सामाजिक समरसता निर्माण झालेली असेल तर सामाजिक समता आपोआप निर्माण होते व टिकते. सामाजिक समरसतेचा अभाव असल्यास समता एकतर निर्माण होणार नाही व कशीबशी निर्माण केलीच तरी ती फार काळ टिकणार नाही. "ओबडधोबड असा मानवी समतेचा विचार" काही लोक सवंग लोकप्रियतेकरिता सांगतात. परंतु प्रतिपादनमार्क्ससारख्या विचारवंतालाही स्वीकारार्ह वाटत नव्हते. शास्त्रशुद्ध अथवा शास्त्रीय समान मानववाद याचा भक्कम आधार सामाजिक समरसता हाच आहे. आणि या समरसतेचाच संस्कार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेवर प्रतिदिन प्रत्येक स्वयंसेवकाच्या हृदयावर अंकित होत असतो.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे ही स्थानके, अलग अलग वाटत असली तरी वास्तविक दिशा व मार्ग एकच आहे. समतेचे व सतरसतेचे दोन्हीचे समर्थक एकाच पथाचे पथिक आहेत निर्भेळ समतेची भाषा बोलणाऱ्यांच्याही अंतर्मनात सामाजिक समरसता त्यांना स्वतःलाच स्पष्टपणे न कळत वास करीत असते. तसेच सामाजिक समारसतेवर पूर्ण आग्रह ठेवणाऱ्यांच्या मनांत सामाजिक समता अध्याहृत असतेच. फरक आहे तो केवळ ठामपणे मांडण्याचा. काही समतावादी ज्याला सामाजिक अभिसरण म्हणतात, त्याचाही अंतिम व्यावहारिक उपयोग सामाजिक समरसता निर्माण करण्याकडेच होतो. त्यातून सामाजिक समतेकडची वाटचाल अप्रत्यक्ष रीतीने म्हणजे सामाजिक समरसतेच्या प्रभावातूनअशीच होते.

आजच्या या मंगल प्रसंगी या दोन्ही पैलूंचा विचार प्रमाणपद्धतेने करणे हीच पूजनीय बाबासाहेब व पूजनीय डॉ. हेडगेवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा खरा उपयुक्त मार्ग

आहे. या प्रसंगी मी इथे उपस्थित राहू शकलो हे मी माझे परम सौभाग्य समजतो. वास्तविक अशा प्रसंगी हे म्हणण्याची पद्धति असते "मी माझ्या तर्फे श्रद्धांजली अर्पण करतो". परंतु एवढ्या थोर पुरुषाला यथार्थ समजून घेण्याकरिता व श्रद्धांजली वाहण्याकरिता जी योग्यता, जी उंची असावी लागते ती माझी नाही, याची मला जाणीव आहे. त्यामुळेच माझ्या मते मी स्वतःही अनधिकार प्रयास न करता हिंदु राष्ट्राच्या एका द्रष्ट्याने पू. बाबासाहेबांच्या पन्नासाव्या वाढदिवसाच्या निमित्ताने पाठवलेल्या संदेश व हिंदुराष्ट्राच्या दुसऱ्या द्रष्ट्यांने त्यांना वाहिलेली श्रद्धांजली इथे प्रस्तुत करून माझे भाषण आटपतो.

## पू. बाबासाहेबांची थोरवी

आपल्या संदेशात स्वा. वीर सावरकर म्हणतात—"आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व; त्यांची विद्‌वत्ता, त्यांचे संघटनाचातुर्य आणि नेतृत्व करण्याचे सामर्थ्य या गुणांची जोड त्यांना मिळाल्यामुळेच ते आज देशाचे एक मोठे आधार म्हणून गणले गेले आहेत. अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यात आणि लक्षावधी अस्पृश्यवर्गीयांत धाडसी आत्मविश्वास व चैतन्य निर्माण करण्यात त्यांनी जे यश मिळवले आहे, त्यामुळे भारताची बहुमोल अशी त्यांनी सेवा केली आहे. त्यांचे कार्य चिरंतन स्वरूपाचे, स्वदेशाभिमानी व मानवतावादी आहे. आंबेडकरांसारखी महान् व्यक्ती तथाकथित अस्पृश्य जातीत जन्मास आली ही गोष्ट अस्पृश्यांच्या हृदयातील निराशा संपवल्याशिवाय आणि तथाकथित स्पृश्यांच्या वरचढपणाला आव्हान देणारी स्फूर्ती आंबेडकरांच्या जीवनापासून त्यांना मिळाल्यावाचून राहणार नाही. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाविषयी व कार्याविषयी आदर बाळगून मी त्यांना आयुरारोग्य आणि मोठे घडामोडीचे आयुष्य चिंततो.

१९६२ साली डॉ. आंबेडकरांच्या चाहत्यांनी ७३ व्या आंबेडकर-जयंतीनिमित्त काढलेल्या गौरवविशेषांकासाठी श्रीगुरुजींनी लहानसा पण मार्मिक मजकूर लिहून पाठवला होता. त्यात श्री गुरुजी लिहितात—

"वंदनीय डॉ. आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करणे हे माझे स्वाभाविक कर्तव्य आहे. भारताच्या दिव्य संदेशाच्या गर्जनेने ज्यांनी सर्व जगाला हालवून सोडले, त्या श्रीमत् स्वामी विवेकानंदांनी दीन, दुबळे, दरिद्री, अज्ञानात पडलेले भारतवासी हेच माझे ईश्वर आहेत, त्यांची सेवा करणे व त्यांच्यात सुप्त चैतन्य जागवून त्यांचे ऐहिक जीवनही सुखपूर्ण व उन्नत करणे हीच खरी ईश्वरसेवा होय, असे सांगितले. आपल्या समाजातील 'शिवू नको' ही अनिष्ट प्रवृत्ती जाणून तीवर व त्या प्रवृत्तीशी संलग्न सर्व रूढींवर कठोर प्रहार केले. सर्व समाजाला पुनः नवीन रचना करण्यास्तव जागे करून आवाहन केले. त्याच आवाहनाचा प्रत्यक्ष पुरस्कार अन्य शब्दांत, अन्य मार्गांनी, राजकीय व सामाजिक अवहेलनेने क्षुब्ध होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आवेशाने केला. अज्ञानात दुःखात

खितपत पडलेल्या व अवमानित अशा आपल्या समाजातील एका मोठ्या व महत्वाच्या भागाला आत्मसन्मानपूर्वक उभे केले ही त्यांची कामगिरी असामान्य आहे. आपल्या राष्ट्रावर हे अपार उपकार त्यांनी केले आहेत. त्यातून उतराई होणे समाजाला कठीण, इतका श्रेष्ठ हा उपकार आहे.

श्रीमत् स्वामी विवेकानंदांनी श्रीमत् शंकराचार्यांची कुशाग्र बुध्दी व भगवानबुध्दांचे परम कारुणिक विशाल हृदय यांचा मेळ घालण्याने भारताचा खरा उध्दार होऊ शकेल असे मार्गदर्शन केलेले आहे. बौध्द मताचा स्वीकार व पुरस्कार करून त्या मार्गदर्शनाचा महत्वाचा भाग पुरा करण्याच्या कार्यात डॉ. आंबेडकरांनी मोठी चालना दिली आहे, असे म्हटले पाहिजे. त्यांच्या विवेचक व कुशाग्र बुध्दीला तत्वज्ञान दृष्ट्या बोध्द मतातील उणीवा दिसत होत्या व त्याचा त्यांनी उल्लेख केला आहे. पण व्यवहारातील समानता, शुचिंता व परस्परासंबंधीची कारूण्यपूर्ण स्नेहमयता या सर्व गुणांतून मिळणारी मानवसेवेची विशुध्द प्रेरणा हे बौध्दमताच्या श्रध्देतून उत्पन्न होणारे लाभ राष्ट्राच्या व मानवाच्या उन्नतीकरिता अगत्याचे आहेत हे जाणूनच त्यांनी आग्रहाने या मताचा पुरस्कार केलेला दिसतो. पूर्वी समाज सुधारण्यासाठी व धर्मांचे स्वरूप विशुध्द करण्यास्तव भगवान बुध्दांनी तात्कालिक समाजधारणांवर टीका केली. वेगळे होण्याकरिता नव्हे. आजच्या काळातही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाच्या भल्यास्तव, धर्माच्या हिताकरिता, आपला चिरंजीव समाज निर्दोष व शुध्द व्हावा याच दृष्टीने कार्यकेले. समाजातून फुटून निघून वेगळा पंथ करण्याकरिता नव्हे, अशी माझी श्रध्दाा आहे. म्हणूनच या युगातले भगवान बुध्दांचे वारसदार या नात्याने त्यांच्या पवित्र स्मृतीस मी अंतःकरणपूर्वक अभिवादन करीत आहे.''

# परिशिष्ट

वास्तविक भारतातील दलित समाज व अमेरिकेतील निग्रो समाज यांची तुलना होऊ शकत नाही. भारतातील तथाकथित दलित वर्ग आमच्याच रक्ताचा व हाडामासाचा आहे. तशी स्थिती अमेरिकेत नाही. त्यामुळे अमेरिकेचे उदाहरण भारताला पूर्णपणे लागू होत नाही. तथापि तेथील निग्रो समाजाच्या संघर्षावरून, राजनीतीवरून व मनःस्थितीवरून बरेच काही शिकण्यासारखे आहे. पूर्णपणे अनुकरण करण्याकरिता नव्हे, तर केवळ उदाहरणाने शिकण्याकरिता या दृष्टीने गेल्या दशकात प्रकाशित झालेले स्टर्लिंग टकर (Sterling Tucker) यांचे 'For Blacks Only' हे पुस्तक अध्ययनीय आहे.

प्रारंभिक परिचयात्मक भागात पुस्तकाचे प्रकाशक म्हणतात :—

"The polarisation of America continues Black (and White) radicals call for the overthrow of the government, for the destruction of what they believe to be a pervasively racist society theirs' is the voice of violence." Responding are those who demand order at any price'—additional laws, harsher penalties, the prompt and sometimes indiscriminate use of police and National Guard Force. These, too, are the voices of voilence."

"Too often, the voices of extremists are the only ones we hear, and we begin to believe that we have to choose between them."

["अमेरिकेत ध्रुवीकरणाची प्रक्रिया चालूच आहे. काळे (आणि गोरे) जहाल सरकार उलथून टाकण्याची, विकृत, वंशवादी वाटणारा समाजच नष्ट करून टाकण्याची हाक देणारा त्यांचा आवाज हा हिंसेचा आवाज असतो. याची प्रतिक्रिया म्हणून, वाटेल ती किंमत द्यावी लागली तरी शांतता आणि सुव्यवस्था राखलीच पाहिजे असे म्हणणारांचा आवाज असतो. आणखी कायदे करा,अधिक कठोर शिक्षा द्या, पोलीस व नॅशनल गार्ड फोर्स यांचा सर्रास वापर करा, अशी त्यांची मागणी असते. हे आवाजही हिंसेचेच आवाज असतात. ["बहुधा अतिरेक्यांचे आवाजच फक्त आपल्या कानी येतात आणि आपल्याला वाटू लागते की, त्यांच्यापैकीच कोणाची तरी निवड करणे आपल्याला प्राप्त आहे."]

सन १९६२ च्या 'मार्च ऑन् वॉशिंग्टन' च्या लिंकन मेमोरियल भाषणांत John Lewis (जॉन लुई) म्हणाले, "The Civil Rights Bill is too little and too late. There is not one thing in that bill that will protect our people

[''नागरी हक्कांचे विधेयक अतिशय अपुरे आहे आणि ते फार उशीरा पुढे आले आहे. पोलीसी अत्याचारांपासून आमच्या लोकांना सुरक्षित राखणारी एकही गोष्ट या विधेयकात नाही. न्यायालयांनी काही कारवाई करण्याची वाट आम्ही पाहणार नाही, कारण शेकडो वर्षे आम्ही या प्रतीक्षेतच घालविली आहेत. आम्ही राष्ट्राध्यक्ष, न्यायखाते, काँग्रेस यांपैकी कोणासाठीही थांबणार नाही. तर आम्ही सूत्रे आमचे हाती घेऊन राष्ट्रीय चौकटीबाहेरचे सत्ता-केंद्र निर्माण करू; क्रांती अगदी उंबरठ्यावर आलेली आहे. ....काळे जनसमुदाय आगेकुच करीत आहेत. आम्ही आमचे दग्धभू धोरण कार्यवाहीत आणू, आणि अहिंसेच्या मार्गाने विरोधकांना धूळ खायला लावू. गेल्या काही महिन्यांतील कृती अगदी किरकोळ ठरतील, असा जबरदस्त उठाव करू''.]

सन १९६४ मध्ये निग्रो आंदोलनाचा दुसरा एक पुढारी Bayard Rustim म्हणतो :

"The Negro Community is no longer taking Martin Luther King's brand of non-violence. No Negro leader, if he wants to be listened to, is going to tell any Negroes that they should love white people. Further more I would not do it because I don't encourage that kind of psychological dishonestly. They don't love them, they don't need them to love them, there is no basis on which they can love them. Who can love people who do these things to people?"

[निग्रो समाज इतःपर मार्टिन ल्यूथर छापाची अहिंसा पत्करणार नाही. इतरांनी आपले ऐकावे अशी इच्छा बाळगणारा कोणीही निग्रो नेता 'गोऱ्यांवर प्रेम करा' असे निग्रोंना सांगणार नाही. मी स्वतः यापुढे हे कधीच करणार नाही. कारण अशा प्रकारच्या मानसिक अप्रामाणिकपणाला मला उत्तेजन द्यावयाचे नाही. निग्रोंचे गोऱ्यांवर प्रेम नाही, त्या प्रेमाची निग्रोंना गरजही नाही. निग्रोंच्या गोऱ्यावरील प्रेमाला कोठलाही आधार नाही, अशी वागणूक देणाऱ्या लोकांवर कोण प्रेम करू शकेल ?'']

ज्या अमेरिकेत आब्राहाम लिंकन, बुकर टी वॉशिंगटन आणि मार्टिन लुथर किंग यांसारखे श्रेष्ठ नेते होऊन गेले तिथेही दोन्ही बाजूंच्या अतिरेकी नेतृत्वामुळे काही काळ वंशवाद इतका प्रबल झाला की दोन्हीकडील समजूतदारपणाचे आवाहन तात्पुरते तरी निष्प्रभ झाल्यासारखे वाटले.

परिस्थिती इतकी आटोक्याबाहेर गेलेली व मनःस्थितीचा लंबक उग्रवादाच्या शेवटच्या टोकाला पोहोचलेला, अशा अवस्थेतही निग्रो समाजातील काही विवेकी पुढारी आपले संतुलन कायम ठेवीत होते ही कौतुकाची गोष्ट आहे. अशा पुढाऱ्यांपैकी एक श्री. स्टर्लिंग टकर यांनी आपल्या मध्ये घेतलेल्या भूमिकेविषयीचे पुढील परिचायक उद्गार

उद्‌बोधक आहेत.

"Sterling Tucker believes there is another way of the sanity and realism. He believes those are at hand within the system effective tools for change.

Tucker begins by providing an overview of the civil rights movement and why it failed. He discusses the meaning of Black power suggesting that this concept initially released wholesome energy, but was not able to offer strength, purpose and cohesion to the equal rights movement. Turning to an assessment of the national mood, he shows that fear and guilt have prevented white American from understanding black anger. Misconstruing the nature of black violence, whites have enshrined 'law and order' at the expense of justice.

Then he proceeds with an analysis of realistic strategies. Having shown the failure of black radicals to relate to the realities of American scene, he considers separatism as concept, showing its dangers as an ideology as well as its constructive uses as a temporary tactic. He deals at length with the question of alliances and suggests the ways in which whites, earlier banished from black organisations, can be entisted again without compromise."

[स्टर्लिंग टकर यांना वाटते की, अन्य एक मार्ग आहे. सुज्ञपणा व वास्तवाची जाण याचा तो मार्ग होय. त्यांचे असेही मत आहे की, परिवर्तन घडवून आणण्याच्या परिणामकारक व्यवस्थेच्या रूपाने हा मार्ग सहज उपलब्ध आहे. टकर यांनी प्रारंभीच नागरी हक्कांचे आंदोलन आणि त्याला आलेल्या अपयशाची कारणे यांचा आढावा घेतला आहे. 'काळ्यांची शक्ती' या शब्दप्रयोगाची चर्चा करून त्यांनी म्हटले आहे की, 'या संकल्पनेने प्रथम निरामय क्रियाशक्तीला वाव मिळाला. पण समान हक्कांच्या एकूण चळवळीला बळ, उद्दिष्ट आणि सुसंवादी स्वरूप प्रदान करण्यास ती समर्थ ठरू शकली नाही. राष्ट्रीय मनोभूमिकेचे सिंहावलोकन करताना त्यांनी दाखवून दिले आहे की, भीती आणि अपराधीपणाची भावना यामुळे काळ्यांचा क्षोभ गोऱ्या अमेरिकनांना समजू शकला नाही. काळ्यांच्या विध्वंसक कृत्यांचा चुकीचा अर्थ लावून गोऱ्यांनी 'कायदा व सुव्यवस्था' यांना देव्हाऱ्यात बसविले आणि हे करताना न्यायाचा बळी दिला.

नंतर प्रश्न सोडविण्यासाठी आखावयाच्या वास्तववादी धोरणांचे विश्लेषण त्यांनी केले आहे. जहाल कृष्णवर्णीयांना अमेरिकन परिस्थितीचा संदर्भ नीट ग्रहण करता आला

नाही, हे दाखवून देऊन अलगतावादाची एक संकल्पना या नात्याने विचार त्यांनी केला आहे. एक विचारप्रणाली या नात्याने त्यांतील धोके तसेच एक तात्पुरता डावपेच या नात्याने त्याचा विधायक उपयोग यांचेही दिग्दर्शन केले आहे. आघाड्यांच्या प्रश्नाचे सविस्तर विवेचन करून काळ्यांच्या संघटनांतून पूर्वी हाकलले गेलेले गोरे सन्मानपूर्वक पुन्हा त्या संघटनांत कसे घेतले जाऊ शकतील, याचे मार्ग सुचविले आहेत.'']

Drawing on his own experience as head of Urban League Field Services, he shows how broader elements of society can be engaged in an attack on the problems of education, employment, crime, housing, police relations and political power. The emphasis maintained throughout it that contrary to radical rhetoric, the anger of the black American can be channeled to work for change within the only framework available to its contemporary American society.''

[अर्बन लीग फील्ड सर्व्हिसेसचा प्रमुख या नात्याने आलेल्या अनुभवाच्या आधारे त्यांनी दाखविले आहे की, व्यापक सामाजिक भूमिकेवरून शिक्षण, रोजगारी, गुन्हेगारी, पोलिसांशी संबंध आणि राजकीय सत्ता या समस्यांवर एकत्रितपणे चढाई करण्यासाठी समाजाच्या निरनिराळ्या अंगोपांगांना प्रवृत्त करता येईल. सर्व विवेचनात या गोष्टीवर भर दिलेला आहे की, जहालांच्या आक्रस्ताळी प्रतिपादनाविरुध्द काळ्या अमेरिकनांचा प्रक्षोभ परिवर्तनाच्या कामी उपयोगात आणता येईल, आणि तोही आजच्या अमेरिकन समाजाला उपलब्ध असलेल्या एकमात्र चौकटीच्या मर्यादेत.]

ज्या अर्बन लीगचे नेतृत्व श्री. टकर करीत आहेत तिचे कार्य १९१० पासून चालू असले तरी तिला Civil Rights Movement (नागरी हक्कांच्या आंदोलनाचे) स्वरूप १९६० नंतर प्राप्त झाले. या चळवळीने विविध रणनीतींचा स्वीकार केला असला तरी सर्वांचा उद्देश एकच होता—समरसता (intergration).

श्री. टकर म्हणतात,

''The only question was how fast integration could be achieved. Except for the isolated fringe groups of black muslims there was no talk of separatism then, no thought of it. The very premise of the movements legal action was that separatism bred and perpetuated inequality. The years of unremitting efforts that triumphed in the landmarked cases of ''Sweatt V. Painter.'' in 1950 and ''Brown V. Topeka'' in 1954 were inspired by the conviction that only in integration could equality come.''

[''समरसता किती द्रुत गतीने साधता येईल हा एकच प्रश्न होता—काळ्या मुस्लिमांचे तुटक छोटे गट सोडल्यास त्या वेळी वेगळेपणाची भाषा बोलली जात नव्हती. त्याचा विचारदेखील नव्हता—आंदोलनाच्या कायदेशीर कारवाईचे गृहीत कृत्यच हे होते की, फुटीरतेमुळे विषमतेला जन्म मिळतो, आणि ती बध्दमूल होते. 'स्वाट विरुध्द पेंटर' आणि 'ब्राऊन विरुध्द टोपेको' या अनुक्रमे १९५० आणि १९५४ साली यशस्वी झालेल्या ऐतिहासिक खटल्यांमागील प्रदीर्घ परिश्रमांना प्रेरणा देणारी श्रध्दा हीच होती की, केवळ समरसतेच्या मार्गानेच समता येऊ शकते.'']

मध्यंतरीच्या काळात दोन्ही बाजूच्या उग्रवाद्यांना प्रोत्साहन देणाऱ्या घटना घडल्या व अर्बन लीगचे कामातील अडचणी वाढल्या हे सर्व खरे असले तरी श्री. स्टर्लिंग टकर यांची ही श्रध्दा कायम आहे की, समरसतेतून समता येऊ शकते व त्या श्रध्देतूनच या आपल्या पुस्तकात त्यांनी आपल्या निग्रो बांधवांना पुढील रणनीतीविषयी मार्गदर्शन केले आहे. मधल्या काळात भावावेशाला बळी पडून निग्रोंनी जी अतिरेकी भूमिका घेतली तिचे दुष्परिणामही ताबडतोबच दिसायला लागले होते. त्यामुळेही श्री. टकरचे प्रतिपादन स्वीकार करण्याची मनःस्थिती सामान्य निग्रोंची होऊ शकली. श्री. टकर यांनी दिलेले मार्गदर्शन स्थूल मानाने पुढीलप्रमाणे आहे. 'केवळ वंशवादाच्या आधारावर संघटन व चळवळ चालविणे आत्मघातकीपणाचे होईल. निग्रोंच्या मजबूत संघटनेची आवश्यकता आहेच. परंतु तिचा पाया संकुचित निग्रोवाद नसावा. निग्रोंची स्थिती सुधारावी अशी प्रामाणिक इच्छा असणारे बरेच गोरे लोक आहेत. संकुचित भावनेमुळे त्यांच्या सहानुभूतीला, समर्थनाला निग्रो समाज निष्कारण मुकेल. शिवाय बऱ्याच समस्या अशा आहेत की त्यामुळे गोऱ्या व काळ्या समाजांतील गरीब लोकांना जवळ जवळ सारखेच कष्ट होतात. अशा समस्यांच्या आधारावर काळ्या व गोऱ्या समाजांतील सर्वच गरीबांना एका मंचावर आणणे शक्य व उपयुक्त आहे. ज्या निग्रोंची संख्या गेली सत्तर वर्षे जवळजवळ अकरा प्रतिशत राहिली आहे. त्यांनी अशा बृहत् संयुक्त मोर्चाचा विचार न केला तर त्यांचा संकुचितपणा, त्यांच्याविषयीची इतरांची सर्व सहानुभूती गमावून बसेल व इतके अल्पसंख्याक असल्यामुळे ते एकटे या विषम संघर्षात विजयी होऊ शकणार नाहीत.'

Tucker says—"We are balck poor & white poor, black worker & white worker, victims of a system whose income distribution is so inequitable as to be almost unbelievable.......

If we blacks are ever to reach our goal of a livable life in America, if we are ever to escape the poverty that grinds us down, we must ally with the whites who are victimised too. No matter if they suffer less than we because their skin is not

black. They still are oppressed, and together we must make common cause against the tax laws that pamper the rich and impoverish the poor, and a common front in our fight for a guaranteed annual income.......Father Geno Baroni, an Italian-American catholic priest.......reminds us that "The danger is terribly real that the demagogues of vote will prey on the anguish of these communities and will further divide those who should be natural allies. Where once noble principle and rhetoric stood in the way of practical change, and the image of the leader abstructed progress for the people, the arts of collective bargaining are being practiced."

"The new breed of leader is ready to concentrate his efforts. He is willing to be a big fish in a little pond. He is concerned that the water should not be polluted in that small pond, and he has the patience to listen and talk with the people.

In the past the organisation that has traditionally predonminated in the black community has been social-church guilds, sororities, men's clubs....... While still active, even these clubs now justify their existence with do-good projects. For the black community has become issue-oriented. Where it once left action on issue to the 'leaders' on top, ....... it is now seizing responsibility itself. In consequence, "The Negro leader" of the community, the ceremonial spokesman, is replaced by a preliferation of local grassroots leaders focused on separate causes and supported by genuine followerships. Where before there would not have been a chance for a neighbourhood-level organisation to get much attention or exert much influence, such organisations can now affect city Hall. The store front leader whose name may not be know downtown has his say now in what housing come up or goes down in his block something is at work that could be called democracy and it is forcing relevance, responsiveness, and a greater measure of integrity on the higher-level black leadership.

The days of the ceremonial black leader are past.......Adam Claytion Powell was defeated because he had come to function as though he were a ceremonial

नेता बनण्यात तो समाधान मानू लागला होता. आजच्या काळ्या समाजाच्या दृष्टीने हे पुरेसे नाही. सामारंभिक नेते समारंभाविनाच बाजूला सारले जात आहेत.''

''तेव्हा, आपण असे नेतृत्व उदयाला येत असलेले पाहात आहोत की, जे जनतेचे आहे. समाजाच्या अगदी तळागाळांतील समस्यांची जाण त्याला आहे. लोकांच्या गरजा त्याला आकलन होतात, व लोकांना ते प्रतिसाद देते. परिस्थितीची गरज ते भागवीत असल्याचे प्रत्ययाला येईल, तोपर्यंत या नवीन नेत्यांना अधिकृतपणा असेल. या नेत्यांना एक नवा अधिकार आहे व कृतीचे एक नवे स्वातंत्र्य आहे.''

समरसतेशिवाय सामाजिक
समता अशक्य
मूल्य रु. १५ /-

## काही अन्य प्रकाशने

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यक्तिदर्शन — मूल्य रु. ४० /-
  (लेखसंग्रह)
- राष्ट्रपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर — रु. २० /-
  (डॉ. अशोक मोडक)
- हिंदुराष्ट्राची संकल्पना — रु. १० /-
  (द. बा. ठेंगडी)
- सामाजिक समता व हिंदू संघटन — रु. ८ /-
  (बाळासाहेब देवरस)
- दलित समस्या : एक विचार — रु. ८ /-
  (द. बा. ठेंगडी)
- गुरुवर्य क्रांतीकारक लहुजी वस्ताद — रु. ७ /-
  (शाहीर योगेश)

भारतीय विचार साधना पुणे प्रकाशन